घरचा स्वाद,
घरची शुध्दता...
शुद्ध खा.. स्वस्थ रहा
नवल
शुध्द घी
म्हशीचे व गायीचे साजुक तुप
मे. नवलमल दौलतराम, बॉम्बेलॉज खाली, आग्रा रोड,धुळे
फोन : (02562) 238661 email : navalgheedhule@gmail.com


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

POST REGD.No./DHL/53/24-26

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.३२२ ■ मंगळवार २५ ऑगस्ट २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४


उत्कृष्ठ क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सत्तावीस ऑगस्टला पंतप्रधान मोदींचा तरूणांशी व्हर्च्युअल संवाद



**नवी दिल्ली, दि.२४- पंतप्रधान नरेंद्र मोदी देशभरातील दीडहजाराहून अधिक ठिकाणी तरुण आणि खेळाडूंशी व्हर्च्युअल संवाद साधणार आहेत. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडा मंत्रालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या देशव्यापी खेलो इंडिया संवाद, खेल की बात-पीएम के साथ, या उपक्रमाचा हा भाग असणार आहे. एकोणतीस ऑगस्टला हॉकीचे दिग्गज खेळाडू मेजर ध्यानचंद यांची जयंती असून हा दिवस देशभरात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त हा विशेष कार्यक्रम राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या दोन दिवस आधी (२७ ऑगस्टला) आयोजित करण्यात आला आहे.**

केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया यांनी दिलेल्या माहितीनुसार, कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांच्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणातील खेळ आणि युवा शक्तीशी संबंधित प्रमुख मुद्द्यांचे सादरीकरण करण्यात येणार आहे. त्यानंतर पंतप्रधान मोदी देशभरातील तरुणांना व्हर्च्युअल माध्यमातून संबोधित करतील. या उपक्रमात देशभरातील दीडहजाराहून अधिक ठिकाणी तरुण, खेळाडू आणि विविध शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. आयआयटी, आयआयएम, एनआयटी, एम्स, प्रमुख वैद्यकीय महाविद्यालये आणि विद्यापीठेही या राष्ट्रव्यापी अभियानात सहभागी होणार आहेत. मांडविया यांच्या मते, खेळात रुची असलेल्या तरुणांमध्ये आणि देशाच्या धोरणकर्त्यांमध्ये थेट संवाद घडवून आणण्याचा हा मोठा प्रयत्न आहे. या माध्यमातून तरुणांना आपले विचार, अनुभव आणि सूचना मांडण्याची संधी मिळणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात माय भारतच्या स्वयंसेवकांच्या स्वागताने होईल. त्यानंतर गेल्या बारा वर्षांत भारताच्या क्रीडा क्षेत्रात झालेल्या बदलांवर आधारित विशेष व्हिडिओ दाखविण्यात येणार आहे. पंतप्रधानांच्या भाषणानंतर देशभरातील विविध ठिकाणी आयोजित प्रत्यक्ष कार्यक्रमांना सुरुवात होईल. (पान ४ वर)

## कांदा साठ रुपये किलो लसूण-आलेही महागले

मुंबई, दि. २४- साखर, गुळ आणि खाद्यतेलाच्या दरवाढीनंतर आता स्वयंपाकघरातील अत्यावश्यक कांदा, लसूण आणि आल्याच्या दरातही मोठी वाढ झाली आहे. गेल्या आठवड्यात सुमारे चाळीस रुपये किलो असलेला कांदा आता थेट साठ रुपये किलोवर पोहोचला आहे. लसणाचा दर दोनशे ते तीनशे रुपये किलो, तर आल्याचा दर दीडशे रुपयांवरून दोनशे रुपये किलोपर्यंत वाढला आहे. त्यामुळे वाढत्या महागाईत ग्राहकांच्या घरखर्चावर अतिरिक्त भार पडला आहे. गेल्या काही दिवसांत कांद्याच्या किरकोळ दरात किलोमागे तब्बल वीस रुपयांची वाढ झाली आहे. मात्र, शेतातून बाजारपेठेपर्यंतच्या साखळीत उत्पादकाला मिळणारा दर आणि ग्राहकाकडून मोजला जाणारा किरकोळ (पान ४ वर)

## कुंभमेळ्याची ०.१ टक्के रक्कम दिली असती तरी मराठी शाळा वाचल्या असत्या; न्यायमुर्ती वराळे

**धुळे, दि. २४ (प्रतिनिधी) : नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा आणि पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांवर सरकारकडून हजारो कोटी रुपये खर्च होत असताना, दुसरीकडे निधीअभावी राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत, यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती प्रसन्न बी. वराळे यांनी खंत व्यक्त केली आहे. शिरपूर येथील पांडू बापू माळी म्युनिसिपल शाळेत स्मार्ट क्लासच्या उद्घाटन प्रसंगी न्यायमुर्ती वराळे बोलत होते. याच शाळेत त्यांनी शालेय शिक्षण घेतले होते. यावेळी त्यांनी शिक्षण व्यवस्थेची सद्य:स्थिती, मराठी भाषेचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत सुविधांवर सविस्तर भाष्य केले. कुंभमेळ्याच्या एकूण खर्चातील ०.१ टक्के रक्कम दिली असती तरी मराठी शाळा वाचल्या असत्या, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.**

शिरपूर येथील पांडू बापू माळी म्युनिसिपल हायस्कूल मध्ये झालेल्या कार्यक्रमात न्यायमुर्ती वराळे म्हणाले, सरकार विविध विकास कामांसाठी आणि उपक्रमांसाठी भरघोस निधी दिल्याचे दावे करते. उपमुख्यमंत्र्यांनी कुंभमेळ्यासाठी बत्तीस हजार कोटी रुपये तर मुख्यमंत्र्यांनी चौतीस हजार कोटी रुपये खर्च करणार असल्याचे सांगितले आहे. एका कॉरिडॉर प्रकल्पासाठी अकरा हजार कोटी रुपये मंजूर झाल्याचे मी वाचले. सरकार हजारो कोटी रुपये खर्च करत आहे, याला माझा कोणताही आक्षेप नाही. मात्र, या हजारो कोटींपैकी केवळ ०.१ टक्के म्हणजे सुमारे बत्तीस कोटी रुपये जरी सरकारने शिक्षणासाठी दिले असते, तरी राज्यभरात बंद पडलेल्या शंभर ते सव्वाशे मराठी माध्यमाच्या शाळा नक्कीच वाचवता आल्या असत्या. वाढत्या विद्यार्थी संख्येच्या तुलनेत शिक्षणावरील तरतूद वाढवण्याऐवजी ती कमी केली जात असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. केंद्राच्या पातळीवर शिक्षणासाठीचे बजेट पूर्वी आठ ते (पान ४ वर)



## बोगस दारूसह बहात्तर ला.चा मुद्देमाल जप्त: लघडवाळ येथे पोलीसांची कारवाई

**धुळे, दि.२४- लघडवाळ (ता. साक्री) शिवारात टर्बो ट्रकमध्ये ६२ लाख ८८ हजार रुपयांचा बनावट दारूचा साठा आढळला. दारूसह ट्रक असा ७२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. एका संशयिताविरुद्ध साक्री पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखा धुळे व साक्री पोलिसांनी संयुक्त कामगिरी केली.**

स्थानिक गुन्हे शाखा, धुळे, साक्री पोलीस ठाणे यांच्या संयुक्त पथकाने साक्री पोलीस ठाणे हद्दीत लघडवाळ गावात एका घरासमोर ट्रक ताब्यात घेत पाहणी केली. संशयित राकेश धनलाल भोये (वय २६, रा. धनकवडी, पारगाव ता. साक्री, जि. (पान ४ वर)

## रणजितसिंह राजपूत धुळे जि.चे नवे माहिती अधिकारी



धुळे, दि.२४- धुळे जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार रणजितसिंह राजपूत यांनी आज स्वीकारला. यापूर्वी ते जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार या पदावर कार्यरत होते. माहिती व जनसंपर्क क्षेत्रातील दीर्घ अनुभवासोबतच बहुमाध्यम संवाद, डिजिटल माध्यमे आणि शासकीय जनसंपर्क क्षेत्रातील विविध अभिनव संकल्पना प्रत्यक्षात साकारण्याचा अनुभव त्यांना आहे. वृत्तपत्र व जनसंज्ञापन, विधी तसेच राज्यशास्त्र या विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या श्री. राजपूत यांनी आपल्या (पान ४ वर)

## चांदसैली घाटातील दरड कायम प्रशासन सुस्तावले; अडचणी वाढल्या


**नंदुरबार (प्रतिनिधी) : धडगावतळोदानंदुरबार मार्गावरील चांदसैली घाटात दरड कोसळून जवळपास एक महिना उलटला असतानाही रस्त्यावर पडलेले मोठमोठे दगड अद्याप हटविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.**

धडगाव तालुक्यातील नागरिकांसाठी तळोदा व नंदुरबारकडे जाण्यासाठी चांदसैली घाटमार्ग हा महत्त्वाचा आणि तुलनेने जवळचा मार्ग आहे. कार्यालयीन कामकाज, उपचारासाठी नंदुरबार येथील सिव्हिल हॉस्पिटल तसेच दैनंदिन प्रवासासाठी शेकडो नागरिक व कर्मचारी या मार्गाचा वापर करतात.

दरवर्षी पावसाळ्यात या घाटात दरड कोसळण्याच्या घटना घडतात. यंदाही दरड कोसळल्यानंतर तात्पुरती डागडुजी करण्यात आली; मात्र रस्त्यावर असलेले मोठमोठे दगड अद्याप हटविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. एखाद्या वाहनाचा तोल गेल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.पूर्वी या मार्गावर मिनी बस सेवा सुरू होती. मात्र, ती बंद झाल्याने नागरिकांना (पान ४ वर)

## इच्छापूर्ती गणपती मंदिरातून मुकुटासह दानपेटी लांबवली

धुळे, दि.२४- धुळे ते साक्री महामार्गावर कुंडाणे (वार, ता. धुळे) शिवारात श्री इच्छापूर्ती गणपती मंदिरातून चोरट्यांनी मूर्तीवरील सुमारे १५ भार चांदीचा मुकुट, मंदिरातील दानपेटी फोडून एकुण ५० हजारांचा मुद्देमाल लंपास केला.श्री इच्छापूर्ती गणपती मंदिराच्या गेटचे कुलूप तोडून २५ ते ३५ वर्षे वयोगटातील चार चोरट्यांनी रविवारी (ता.२३ ) पहाटे तीन ते चार च्या सुमारास आत प्रवेश केला. चोरट्यांनी तोंडाला रुमाल बांधलेले, हातमोजे घातले होते. चोरट्यांनी मूर्तीवरील चांदीचा मुकुट, मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील सुमारे ४५ हजार रुपयांची रोकड असा एकूण पन्नास हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.यासंदर्भात अमित भगवान महाजन (४३, रा. प्रमोद नगर, देवपूर, धुळे) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.



## माजी मंत्री डॉ.विजयकुमार गावितांच्या प्रकृतीत सुधारणा; कार्यकर्ते खूश

**नंदुरबार (प्रतिनिधी ) महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री तथा भाजपाचे विद्यमान आ.डॉ. विजयकुमार गावित यांच्या प्रकृतीत सुधारणा झाली असल्याने सलग आठ महिने गंभीर आजारपणाशी झुंज दिल्यानंतर दि.२४ ऑगस्ट २०२६ रोजी त्यांचे नंदुरबार येथे आपल्या जन्मभूमीत आगमन झाले. दीर्घ प्रतिक्षेनंतर ते नंदुरबार येथे सुखरूप परतलेले पाहून त्यांच्या निवासस्थानी भेट देणाऱ्या चाहत्यांमध्ये त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांमध्ये मोठे उत्साहाचे, चैतन्याचे वातावरण पहायला मिळाले.**

जानेवारी २०२६ अखेर हृदयविकारामुळे (पान ४ वर)

## सुरक्षेससाठी सर्वत्र सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसवा महिला व बालकल्याण समिती सभेतील सूर

**धुळे, दि.२४- शहराच्या विशिष्ट भागात महिलांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. महिला फक्त त्याच भागातल्याच असुरक्षित आहेत का ? शहरातील इतर भागातही महिला असुरक्षित असल्याने सर्वत्र सी.सी.टी.व्ही. यंत्रणा कार्यान्वित करण्यात यावी. अशी मागणी नगरसेविका वैभवी दुसाने, प्रतिभा पाटील यांनी केली. तसेच महिलांसाठी सार्वजनिक शौचालयांसह कुपनलिकांचा विषय नगरसेविका शेख परवीनबानो, अन्सारी हसीना बानो यांनी मांडला.**



महापालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या सभेप्रसंगी सभापती उज्वला ठाकरे, उपसभापती शोभा भील यांच्यासह नगरसचिव मनोज वाघ, सहायक आयुक्त सोनाली देवरे यांच्यासह सदस्या प्रतिभा पाटील, वैभवी दुसाणे, प्रियंका बोरसे, शेख परवीन बानो रफीक, मंगला सोनवणे, हसिना बानो साजिद अली अन्सारी, अन्सारी अमेरा बानो सउदुल हसन उपस्थित होते. सभेतील सर्व चार विषय मंजूर करण्यात आले.

यावेळी बोलतांना नगरसेविका वैभवी दुसाणे यांनी सांगितले की, फक्त साक्री रोड, मोराणे या भागातील महिलाच असुरक्षित नाहीत. आमच्याही भागातील महिला असुरक्षित आहेत. याठिकाणी नुकतीच चेन स्नॅचिंगची घटना घडली. त्यामुळे नकाणे रोड, वाडीभोकर रोड अशा सर्व मुख्य रस्त्यांवरही सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्याची मागणी केली. यासह साईबाबा नगर आणि आंबेडकर नगरातील शौचालयाचा विषय दुसाणेंनी उपस्थित केला. यावर महापालिकेने जागेचा अभाव असल्याने शौचालयाचे काम रखडल्याचे सांगितले. तसेच जुने शौचालय दुरुस्त करण्याचे आश्वासन दिले. प्रतिभा पाटील यांनी नाईट व्हिजनचे कॅमेरे बसविण्याची सूचना केली. शिवाय, सदर कॅमेरे सुरु व बंद असल्याबाबतचा अहवाल दर महिन्याला समितीसमोर ठेवण्याची मागणीही केली. नगरसेविका शेख परवीन बानो यांनी (पान ४ वर)

## अत्याधुनिक शासकीय कॅन्सर रुग्णालय व संशोधन केंद्र सुरू करा आ.अनुप अग्रवालांचे आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकरांकडे मागणी

**धुळे, दि.२४- भौगोलिक दृष्ट्या उत्तर महाराष्ट्रातील महत्त्वाचे ठिकाण असलेले धुळे शहर खान्देशतील आरोग्य सेवेच्या दृष्टीनेही तितकेच महत्त्वपूर्ण आहे. या पार्श्वभूमीवर धुळे जिल्ह्यासह खान्देशातील लाखो नागरिकांच्या आरोग्य व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी धुळे येथे अत्याधुनिक शासकीय कॅन्सर रुग्णालय व संशोधन केंद्र सुरू करावे, अशी आग्रही मागणी शहराचे आ.अनुप अग्रवाल यांनी राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याणमंत्री प्रकाश आबीटकर यांच्याकडे जिल्हा रुग्णालयातील महिला व बाल रुग्णालयाच्या उद्घाटनासाठी आले, त्यावेळी आ.अग्रवाल यांनी आरोग्यमंत्री आबीटकर यांच्याकडे कॅन्सर रुग्णालय सुरू करण्यासह विविध मागण्या मांडल्या तसेच त्या मागण्यांची निवेदनेही दिली.**



आमदार अग्रवाल यांनी निवेदनात म्हटले आहे, की धुळे जिल्हा गुजरात व मध्य प्रदेश या राज्यांसह जळगाव-नंदुरबार-नाशिक या तीन जिल्ह्यांच्या सीमांलगत आहे. तसेच संपूर्ण जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गासह दळणवळणासाठी विविध राज्य मार्गांच्या सुविधेमुळे धुळे शहरातील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह सर्वोपचार रुग्णालय तसेच जिल्हा रुग्णालय आणि शहरातील अन्य खासगी रुग्णालयांत मोठ्या संख्येने रुग्ण उपचारांसाठी दाखल होतात. आज धुळे शहर आपत्कालीन आरोग्यसेवेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठिकाण आहे. मात्र, कॅन्सरसारख्या गंभीर आजारावर उपचारांसाठी आजही मुंबई-पुण्यासह मोठ्या शहरांत जावे लागते. सामान्य व गोरगरीब रुग्णांना कॅन्सरच्या उपचारांसाठी वारंवार मोठ्या शहरांत जाऊन उपचार घेणे त्यांच्या आर्थिक आवाक्याबाहेरचे ठरते. त्यामुळे त्यांना कॅन्सर उपचारांपासून वंचित राहावे लागते.

या पार्श्वभूमीवर धुळे शहरात किमान खाटांचे सुसज्ज कॅन्सर सुपर स्पेशालिटी (पान ४ वर)



## शहादा महा.त आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थ.योजनेचे धनादेश वाटप

**शहादा,दि.२४ (का.प्र.)- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाद्वारे पूज्य साने गुरुजी विद्याप्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी अर्थसहाय्य योजनेचे धनादेश वितरण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एम. के. पटेल यांच्या हस्ते लाभार्थी विद्यार्थ्यांना हे धनादेश प्रदान करण्यात आले.**

या वेळी विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आर. एस. माळी व डॉ. खुमानसिंग वळवी उपस्थित होते.महाविद्यालय विद्यापीठाच्या सहकार्याने गरजू, होतकरू व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे आणि शिकण्याची प्रेरणा मिळावी म्हणून नेहमी विविध योजना राबवून आर्थिक मदत पुरवत असते. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये या योजनेअंतर्गत महाविद्यालयातील ११ विद्यार्थ्यांना एकूण ५४,५०० रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे.या योजनेचा प्रस्ताव महाविद्यालयातील विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. आर. एस. माळी यांनी प्राचार्य डॉ. एम. के. पटेल यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केला होता. ही मदत मिळवून देण्यासाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रवीण न. महाले, नंदुरबार जिल्हा संयोजक डॉ. व्ही. ओ. शर्मा, सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. जगदीश चव्हाण व महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. सारिका फुलपगारे यांनी विशेष सहकार्य केले.सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांचे पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाचे

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,44,300 रु.+3% GST
सोने- 24 K -1,57,500 रु.+3% GST
चांदी- 2,43,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## विहिरीत बुडून वृद्धेचा मृत्यू

धुळे, दि.२४- धुळे तालुक्यातील बेंद्रेपाडा येथील वच्छलाबाई रावण हिरे (वय ६७) यांचा गाव शिवारातील विहिरीत बुडून मृत्यू झाला. रविवारी सकाळी विहिरीत तरंगताना त्यांचा मृतदेह निदर्शनास आला. ग्रामस्थांच्या मदतीने बाहेर काढून त्यांना श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. धुळे तालुका पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

## दारूच्या नशेत पडल्याने मृत्यू

धुळे, दि.२४- दारूच्या नशेत पडल्याने डोक्याला गंभीर दुखापत होऊन बाळापूर (ता. धुळे) येथील एकाचा मृत्यू झाला. जितेंद्र रमेश शेलार असे त्याचे नाव आहे. घराजवळच रोडवर दारूच्या नशेत पडल्याने त्यांना डोक्याला दुखापत झाली. त्यांना सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात नोंद झाली.

## कामगाराचा मृत्यू

धुळे, दि.२४- गोवर्धन गोपाल लोहार (५२, रा. ज्योतीबा नगर देवपुर धुळे) असे त्यांचे नाव आहे. देवपूर परिसरात एका ठिकाणी फर्निचरचे काम करताना त्यांना छातीला गंभीर दुखापत होऊन रक्तस्त्राव झाला. त्यांना श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल केले. डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करा; महानगरपालिकेचे आवाहन



**धुळे, दि.२४- माझी वसुंधरा अभियानांतर्गत धुळे महानगरपालिका पर्यावरणपूरक धुळे या संकल्पनेकडे वाटचाल करीत असून, यावर्षीचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक गणेशोत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्धार करण्यात आला आहे. या उपक्रमात शाळा व विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन धुळे महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.**

पर्यावरणपूरक धुळे आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सव या संकल्पना यशस्वी करण्यासाठी विद्यार्थ्यांचा कृतीशील सहभाग महत्त्वाचा आहे. त्यानुसार शाळांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी प्रेरित करून विविध उपक्रम राबविण्यास प्रोत्साहित करावे. विद्यार्थ्यांनी घरी गणेशमूर्तीची स्थापना करताना पालकांना शाडू मातीची मूर्ती घेण्यासाठी आग्रह करावा. गणेशमूर्तीची सजावट करताना पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करावा तसेच प्लास्टिक, थर्माकॉल, फायबर यांसारख्या पर्यावरणास घातक साहित्याचा वापर टाळावा. सजावटीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचे संदेश प्रदर्शित करावेत.

गणेशोत्सवाच्या कालावधीत वृक्षारोपण, परिसर (पान ४ वर)

## शहाद्यात भाजप महिला मोर्चाची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न

**शहादा,दि.२२ (का.प्र.)- भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा नंदुरबार जिल्ह्याच्या वतीने शहादा येथे संघटनात्मक आढावा बैठकीचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. लोणखेडा (ता. शहादा) येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर विश्वेश्वरय्या सभागृहात भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.**

या बैठकीस नंदुरबार जिल्हा परिषदेच्या माजी शिक्षण सभापती जयश्रीबेन दीपक पाटील, शहादा नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षा माधवी मकरंद पाटील, भाजप नंदुरबार जिल्हा महिला मोर्चाच्या अध्यक्षा समिधा नटावदकर आणि युवा नेत्या नेहाताई राजेश पाडवी यांच्यासह जिल्ह्यातील महिला मोर्चाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.बैठकीदरम्यान पक्षसंघटन अधिक मजबूत करणे, संघटनात्मक बांधणी, महिलांचा राजकीय व सामाजिक सहभाग वाढवणे आणि महिला मोर्चाच्या आगामी विविध उपक्रमांचे नियोजन याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली.उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत प्रदेशाध्यक्षा चित्राताई वाघ यांनी त्यांच्या अडचणी, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की, महिला कार्यकर्त्यांनी संघटनेच्या माध्यमातून समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहचावे आणि केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहचवावी.या आढावा बैठकीमुळे उपस्थित महिला कार्यकर्त्यांमध्ये नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात पक्षातर्फे संघटनात्मक कामाला अधिक गती देण्याचा निर्धार या वेळी व्यक्त करण्यात आला.

## राजस्थानातील प्रोसेस सेंटर सुरू करा यंत्रमाग पूर्वपदावर आणा : काँग्रेस



**धुळे, दि.२४- राजस्थानातील पाली, बालोत्रा व जोधपूर येथील प्रोसेस सेंटर गेल्या सुमारे ७० दिवसांपासून बंद असल्याने त्याचा थेट परिणाम धुळे शहरासह महाराष्ट्रातील पावरलूम उद्योगावर झाला आहे. कच्च्या कापडाची प्रक्रिया ठप्प झाल्याने यंत्रमाग उद्योगाची उत्पादन साखळी विस्कळीत झाली असून, कामगारांसमोर रोजगाराचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे राजस्थानातील बंद प्रोसेस सेंटर तातडीने सुरू करून यंत्रमाग उद्योग पूर्वपदावर आणावा, अशी मागणी धुळे जिल्हा (ग्रामीण) काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष युवराज करनकाळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.**

यंत्रमाग उद्योगाच्या या प्रश्नासाठी काँग्रेसकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. खा.डॉ. शोभा बच्छाव यांना ८ ऑगस्ट रोजी यासंदर्भात निवेदन देण्यात आले होते. त्यानंतर अखिल भारतीय काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे अध्यक्ष तथा राज्यसभा खासदार इमरान प्रतापगढी, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची १९ ऑगस्ट रोजी मुंबईतील टिळक भवन येथे भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी पावरलूम उद्योगाच्या गंभीर प्रश्नावर सविस्तर चर्चा करून शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली. दरम्यान, दि.२३ ऑगस्ट रविवारी रोजी दुपारी १२ वाजता धुळे शहरातील वडजाई रोड परिसरातील पावरलूम ओनर असोसिएशनच्या कार्यालयात पावरलूम उद्योगाच्या प्रश्नावर पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. बैठकीत राजस्थानातील बंद प्रोसेस सेंटरमुळे धुळे शहरातील यंत्रमाग उद्योगावर होत असलेल्या परिणामांवर सविस्तर चर्चा करण्यात (पान ३ वर)

# आपला महाराष्ट्र

## व्यवस्थेच्या चक्रव्युहात अडकलेला बेरोजगार तरूण

एकशे चाळीस कोटीहून अधिक लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात बेरोजगारीची व्याख्या नोकरीशी जोडलेली आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षा, क्लासेसचे कारखाने, नीट परीक्षा पेपर फुट आणि स्पर्धा परीक्षांच्या पेपर फुटीची प्रकरणे यात सारा तरुण वर्ग अडकलेला आहे. त्याच्या चर्चेत अडकलेला आहे. नव्हे त्याला तसे अडकवून ठेवलेले आहे. धोरणकर्त्यांनी देखील खेडी उध्वस्त केली. ग्रामोद्योग संपविले. सूक्ष्म आणि लघु उद्योगाचे जाळे विणले नाही. शेतीपूरक उद्योग भांडवलदारांकडे वर्ग केले. रोजगाराच्या संधी शहरात आणि कंपन्यांकडे वळवल्या उद्योगाचे वातावरण तयार न करता किंवा समस संस्कृती निर्माण न करता सर्वांच्या डोक्यात सरकारी नोकरी किंवा एखाद्या कंपनीमध्ये नोकरी एवढीच रोजगारीची व्याख्या तयार केली. कोणी स्वायत्त होऊ नये. स्वावलंबी होऊ नये तर लाचार व्हावे आणि त्यांना सरकारने पोसावे. त्यातून सरकारच्या पक्षाला त्यांनी वाहून घ्यावे किंवा शरण जावे यासाठीची जी व्यवस्था असते ती निर्माण करण्यात आलेली आहे. अडचण अशी आहे की तरुणही किंवा त्यांचे पालक या मानसिकतेतून बाहेर पडायला तयार नाहीत म्हणून. आजच्या काळात बेरोजगारी हा कोणताही धोका नसलेला एक व्यवसाय बनला आहे, यात व्यवस्थेला कोणतेही नुकसान नाही. परीक्षा अर्जाच्या नावाखाली आकारले जाणारे शुल्क प्रत्यक्षात तरुणांच्या आशेवर लादलेला करच आहे असे म्हणावे लागेल. परीक्षेत ८ लाखांपेक्षा जास्त तरुणांकडून सरासरी ७०० रुपये प्रति अर्ज या दराने सुमारे ६० कोटी रुपये थेट वसूल केले गेले, परंतु लुटीचे हे गणित इथेच संपत नाही.

जेव्हा परीक्षा ३ ते ४ वर्षे लांबणीवर पडतात, तेव्हा अर्जाच्या नावाखाली जमा झालेल्या या करोडो रुपयांवर सरकारी तिजोरी किंवा संस्था बँकांमधून प्रचंड व्याज कमावतात. हा बहुधा जगातील असा एकमेव व्यवसाय असा असेल की, ज्याठिकाणी गरीब ग्राहक कर्जाऊ पैसे घेऊन आधी देतो, वर्षानुवर्षे वाट पाहतो आणि बदल्यात काहीच न मिळाल्यास ग्राहक न्यायालयाचे दारही ठोठावू शकत नाही.बेरोजगारीच्या मूळ कारणांचा निपटारा करण्याऐवजी, व्यवस्था अनेकदा तत्कालिक मॅनेजमेंटचा सहारा घेते. अलीकडच्या बजेटमध्ये घोषित केलेली इंटरर्नशिप योजना अशीच आहे. कागदावर असा दावा केला जातो की लाखो तरुणांना देशातील अव्वल कंपन्यांमध्ये काम शिकवले जाईल, परंतु जमिनीवरील वस्तुस्थिती अशी आहे की या कंपन्यांकडे दरवर्षी लाखो नवीन तरुणांना काम शिकवण्यासाठी पायाभूत सुविधा किंवा साधनेच नाहीत. अशा योजना जमिनीवर रोजगार निर्माण करण्यासाठी नाही, तर फक्त बातम्यांसाठी बनवल्या जातात.आयुष्याच्या ज्या टप्प्यावर लग्न आणि कुटुंबाचा विचार करायला हवा, तिथे तरुण आपल्या बेरोजगारीमुळे गुदमरत आहे. जेव्हा एखादा तरुण आपल्या आई-वडिलांच्या म्हातारपणाचा आधार बनण्याऐवजी आणि त्यांच्या औषधांचा खर्च उचलण्याऐवजी,२८-३० वर्षांच्या वयातही त्यांच्याकडेच पैसे मागण्यास भाग पाडला जातो, तेव्हा तो नवीन नात्याची जबाबदारी स्वीकारण्याचे धैर्य ठेवणार नाही.ही क्रूर व्यवस्था केवळ तरुणांच्या नोकऱ्याच हिरावून घेत नाहीये, तर संपूर्ण पिढीला कौटुंबिक आणि सामाजिकदृष्ट्या अपंग बनवत आहे. आणि पिढ्यान पिढ्या तसेच चालले आहे. ही सुद्धा एक गंमत आहे. त्या विरुद्ध बोलण्याची कुणाचीच टाप नाही.

एका राज्याचे बजेट मध्ये शिक्षणासाठी केलेल्या आर्थिक तरतुदीतून त्या राज्याची मानसिकता आणि स्थिती काय आहे हे चटकन लक्षात येते. जेव्हा प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची भरती वर्षांनुवर्षे थंड बस्त्यात पडलेली असते, तेव्हा पोलीस विभागात लाखो भरत्या वेगाने पूर्ण केल्या जातात, ती व्यवस्था जबरीने नियंत्रण करण्यासाठी असते. . एका शिक्षकाचे काम नागरिक तयार करण्याचे असते.ते तर्क करणारे नागरिक तयार करतात. प्रश्न विचारणारे तयार करतात आणि आपल्या हक्कांबद्दल जागरूक असतात.. दुसरीकडे, पोलीस दलाचा वापर व्यवस्थेला नियंत्रित करण्यासाठी केला जातो. जेव्हा वर्षांनुवर्षे वाट पाहणारा हताश तरुण रस्त्यावर आपल्या हक्कासाठी उतरतो, तेव्हा त्याला गप्प करण्यासाठी त्या पोलीस बळाचा वापर केला जातो . तशी व्यवस्थाच निर्माण करण्यात आलेली आहे. याला दमन नीती म्हणतात. असे असले तरी ही वेळ हताश होण्याची नाही, तर व्यवस्थेने निर्माण केलेल्या राजकारणाला समजून घेण्याची आहे. तरुण आणि समाजाने आता परीक्षा कधी होणार हे विचारणे बंद केले पाहिजे. त्याऐवजी हा प्रश्न उपस्थित केला पाहिजे की अर्ज शुल्काच्या नावाखाली वसूल केलेल्या करोडो रुपयांचे व्याज कोणत्या फंडात गेले.ज्या दिवशी या देशातील तरुण आपल्या आशेवर लादल्या जाणाऱ्या या कराला आणि आपला आवाज दाबण्याच्या या रणनीतीला समजून घेईल, त्या दिवशी ही व्यवस्था त्यांना ग्राहक किंवा मतपेटी समजणे बंद करेल.नोकऱ्या आणि त्यामध्ये भरती करण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षांनी मोठ्या प्रमाणावर नफा मिळवून देणारा एक नवा व्यापार निर्माण केला आहे. हा धंदा वैध-अवैध अशा दोन्ही मार्गांनी केला जातो.त्या आधारावर राहुल गांधीही देशभरात याच गोष्टींचा शोध घेत आहेत.

ऐंशी लाख ६० हजार युवक, ३.५३९ पदे, जवळपास ६० कोटी रुपयांची फॉर्म फी आणि चार वर्षांचा अंतहीन प्रतीक्षा काळ हे केवळ काही आकडे नाहीत, तर उत्तर प्रदेश सारख्या माध्यमिक शिक्षण सेवा निवड मंडळाच्या नावाखाली राबवण्यात आलेल्या त्या चक्रव्यूहाचे सरळ गणित आहे, त्यात आज लाखो कुटुंबे अडकली आहेत. महाराष्ट्रातील स्थिती यापेक्षा वेगळी नाही.देशातील तरुण रोजगारासाठी दारोदार भटकत असताना, व्यवस्थेने त्यांच्या आशा आकांक्षेचे नफेखोर व्यवसायात रूपांतर केले आहे. याला केवळ व्यवस्थेचेअपयश किंवा प्रशासकीय दिरंगाई म्हणून टाळून देता येणार नाही . या आकडेवारीचा खोलवर विचार केला, तर एका अतिशय क्रूर अर्थव्यवस्थेचा चेहरा समोर येतो. या अर्थव्यवस्थेत बेरोजगारी ही समस्या नसून नफा कमावण्याचे सर्वात सुरक्षित साधन बनली आहे.

बेरोजगारी आणि सरकारी भरतीमुळे होत असलेली ही वेदना केवळ काही आकडे किंवा तथ्यांचा दस्तऐवज नाही; तर ती त्या दुःखाची, घुसमटीची आणि मूक आंदोलनाची कहाणी आहे, आज ती देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात आहे . एखादा तरुण आपल्या तारुण्यातील सर्वांत मौल्यवान वर्षे केवळ वेबसाइटचा शोध घेण्यात घालवत असेल तर त्याचे अर्धे आयुष्य केवळ शोध घेण्यात जाते. सन २०२२ मध्ये उत्तर प्रदेशातील तरुणांनी जेव्हा फॉर्म भरला, तेव्हा त्यांच्यासाठी तो एक कागद नव्हता तर त्यांनी आपल्या वयस्कर होत चाललेल्या आई-वडिलांच्या शेवटच्या आशा आणि आपल्या रात्रींची झोप गहाण ठेवली होती. आज चार वर्षांनंतर ही प्रतीक्षा अशा भयानक दुःस्वप्नात बदलली आहे, त्यावर व्यवस्थेकडे उत्तर नाही आणि उपचारही नाही.सरकारी भरतीमध्ये वर्षानुवर्षे होणारा विलंब केवळ लालफितीचा वा दिरंगाई चा भाग नसून तो तरुणांच्या अशा आकांक्षांना मोडून टाकणारे हत्यार आहे. जेव्हा २३ वर्षांचा ऊर्जावान तरुण नोकरीच्या तयारीत बसता बसता २७ वर्षांचा होतो, तेव्हा त्याचा आत्मविश्वास हळूहळू संपत जातो. या प्रक्रियेचे अंतिम उद्दिष्ट असे असते की, जेव्हा तरुण पूर्णपणे थकून जातो, तेव्हा तो स्वतःचे अस्तित्व टिकवण्यासाठी चार हजार रुपयांची ट्यूशन किंवा दहा हजार रुपयांची डिलिव्हरी बॉयची नोकरी हाच आपला नियतीचा भाग मानून घेतो. एक तुटलेला आणि थकलेला तरुण आपल्या हक्कांसाठी सत्तेला कधीही तीव्र प्रश्न विचारत नाही.हे आजचे वास्तव असले तरी आज परिस्थिती बदलली आहे. तरुण आपली पिळवणूक आता सहन करू शकत नाही. तोही बदलला आहे. रस्त्यावर उतरून त्याच्या परिस्थितीला कारणीभूत असलेल्या व्यवस्थेला तो प्रश्न विचारतो. त्यासाठी रस्त्यावर उतरतो. लाठ्या खातो. आणि उपाशीही राहतो. तो आता थांबणार नाही.

### भाजप महिला मोर्चाची आढावा बैठक संपन्न

शहादा,दि.२४ (का.प्र.)- भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा नंदुरबार जिल्ह्याच्या वतीने शहादा येथे संघटनात्मक आढावा बैठकीचे उत्साहात आयोजन लोणखेडा (ता. शहादा) येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर विश्वेश्वरय्या सभागृहात भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा आ. चित्रा वाघ यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था, व सर्व संबंधीतांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन-** मौजे निमखेडी ता.जि. धुळे येथील गट क्रं. व उपविभाग २१ चे ला.ला क्षेत्र ० हे ५१ आर, व पो.ख.० हे. ०६ आर असे एकूण क्षेत्र ० हे ५७ आर चा आकार ० रु.९५ पैसे यापैकी सखुबाई दिंगबर निकम आणि महेंद्र दिंगबर निकम यांचा अविभक्त हिस्सा अश्या वर्णनाची जिरायत शेतजिमन मिळकत यास जुन्या वहिवाटी प्रमाणे कायमस्वरूपी वापर रस्ता आहे व राहिल.

यासी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे

येणे प्रमाणे वरील वर्णनाच्या आतील मिळकत ही १) सखुबाई दिंगबर निकम २) महेंद्र दिंगबर निकम दोघेही रा मु.बल्हाणे पो. पाडळदे ता.जि.धुळे यांच्या संयुक्त मालकीच्या व ताबेउपभोगातील असून यांच्या कडून सदर मिळकतीं या आमचे अशिल यांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचा सौदा केलेला असून सदर मिळकत सौदापोटी आमचे अशिलांकडून त्यांनी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली आहे. आमचे अशिल सदरचा व्यवहार लवकरच पूर्ण करणार आहेत. तरी सदर मिळकती संदर्भात कोणचेही कुठल्याही प्रकारचे संबंध, हक्क, गहाण, तारण टाच, बक्षिस, दावा, अर्जफाटे, हितसंबंध, तक्रार अथवा हरकत असेल तर त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्त्यावर लेखी व कागदोपत्री पुरावा दाखवून प्रत्यक्ष भेटून शहानिशा करुन खात्री करुन द्यावी. अन्यथा उक्त मुदतीत कोणाचीही हरकत, तक्रार न आल्यास सदरची मिळकत ही निर्बोज, निर्वेध व वरील मालकांच्या संयुक्त मालकीची व ताबेउपभोगातील असल्याचे गृहीत धरुन खरेदीचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील. त्यानंतर आलेल्या हरकतींच अथवा तक्रारींचा विचार केला जाणार नाही, व परस्पर वर्तमानपत्रातून घेतलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. व ते आमच्या अशिलांवर सदर मिळकतीवरही बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस ही आमच्या अशिलांनी दिलेल्या माहिती अधिकार व सांगण्यावरुन त्यांचेतर्फे आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दि.२४/०८/२०२६.

**ॲड.ललित पांडुरंग देठे**
चव्हाण कॉम्प्लेक्स, सुरतवालाबिल्डींग जवळ, मिलपरीसर, धुळे.
**मो.नं.९४२२७७१२७४**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि. धुळे येथील सर्व्हे नं.७/१२ पैकी प्लॉट नं.३३ चे क्षेत्र १८७ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.४०, दक्षिणेस : प्लॉट नं.३४, उत्तरेस : प्लॉट नं.३२. येणे प्रमाणे वर्णनाची मिळकत १) नम्रता सचिन जयस्वाल २) मिना सुनिल परदेशी, दोघे रा.कुसंबा, ता.जि.धुळे यांचे मालकीची असून त्यांनी सदरहु मिळकती पैकी उत्तरेकडील भागाचे क्षेत्र ८५ चौ.मी. यांसी चर्तु:सिमा- पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.४०, दक्षिणेस : प्लॉट नं.३३ पैकी भाग, उत्तरेस : प्लॉट नं.३२. येणे प्रमाणे बखळ प्लॉट मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदरहु मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, कब्जापावती, मुखत्यारपत्र, रक्कम देणे/घेण, आरक्षण, कोर्ट वाद, सॉल्वन्सी, इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निर्बोज आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २४/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वलवाडी, ता.जि.धुळे येथील स.नं.१४/१/२ पैकी प्लॉट नं.४४ चे एकूण क्षेत्र १५० चौ.मी. यांसी चतु:सिमा- पुर्वेस रस्ता, पश्चिमेस : प्लॉट नं.३९, दक्षिणेस : प्लॉट नं.४३, उत्तरेस : प्लॉट नं.४५. येणे प्रमाणे वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत १) श्री.नरेंद्र काशिनाथ पवार २) लता नरेंद्र पवार, दोघे रा.श्री गुरु कॉलनी, वलवाडी शिवार, धुळे यांचे मालकीची असून त्यांनी वर नमूद मिळकत कायमस्वरूपी विकण्याचा सौदा आमचे अशिलांशी केला आहे.

आमचे अशिलांना सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, तारण, करार, सौदा, कब्जा, विसार पावती, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, कब्जापावती, रक्कम देणे/घेणे इ. असल्यास अथवा सदर मिळकतीचे कोणतेही मूळ दस्त जमा/तारण असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतीसह आमच्या कार्यालयात लेखी हरकत नोंदवावी. तोंडी हरकत किंवा परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द केलेल्या व मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत व योग्य त्या पुराव्यानिशी प्रत्यक्ष आमच्या कार्यालयात हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून संबंधितास तसा दाखला देण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आमचेवर बंधनकारक असणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या माहितीवरून व सांगणेवरून आमचेमार्फत प्रसिध्दीस दिली असे.

धुळे, दिनांक:- २४/०८/२०२६.

**ॲड.विजय म.मोरे**
नोटरी- भारत सरकार
रा.बी/१२, भन्साली प्लाझा, नगरपट्टी, धुळे
**मो.नं.९८२२८५२६५०**

### मुंबईतील तज्ज्ञ डॉक्टर करणार तपासणी

## भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिर


**शिरपूर, दि.२४- एस.व्ही.के.एम. संचालित श्रीमती कृतिबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, शिरपूर यांच्या वतीने एस.व्ही.के.एम. संस्थेचे सहअध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत संधिवात व विविध अस्थी-सांधेदुखीच्या आजारांसाठी मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

मुंबई येथील तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर होणार असून, शिरपूर शहर व तालुक्यातील नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

संधिवात व अस्थीविकारांवर विशेष तपासणी

आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमुळे तसेच बदलत्या आहार-विहारामुळे सांधेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी यांसह मणक्यांशी संबंधित विविध समस्या वाढताना दिसत आहेत. या पार्श्वभूमीवर नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व योग्य मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

शिबिरात संधिवात, पाठदुखी, टाचदुखी, हातापायाला मुंग्या येणे, मणक्याचे विकार, नस दबणे, मानदुखी, आमवात, कंबरदुखी, गुडघेदुखी, सायटिका, हाडे ठिसूळ होणे तसेच गादी सरकणे आदी आजारांची तपासणी केली जाणार आहे. संबंधित आजारांबाबत रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मार्गदर्शन तसेच आयुर्वेदिक उपचारपद्धतीची माहिती देण्यात येणार आहे.



बीएमडी, ईसीजी व एक्स-रे अल्पदरात

शिबिरामध्ये आवश्यकतेनुसार बीएमडी (हाडांची तपासणी), ईसीजी आणि एक्स-रे या वैद्यकीय तपासण्या अल्पदरात करून देण्यात येणार आहेत. त्यामुळे हाडांची घनता, हृदयाशी संबंधित प्राथमिक तपासणी तसेच आवश्यक एक्स-रे तपासणीची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

याशिवाय रुग्णांना आवश्यक आयुर्वेदिक औषधी ३० टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच पंचकर्म चिकित्सा सवलतीच्या दरात करण्यात येणार असल्याने गरजू रुग्णांना त्याचा लाभ घेता येणार आहे.

नावनोंदणी सुरू

शिबिरासाठी दि. १५ ऑगस्ट २०२६ पासून नावनोंदणी सुरू करण्यात आली आहे. नावनोंदणी केलेल्या सर्व रुग्णांची शिबिराच्या दिवशी तपासणी करण्यात येणार आहे. नागरिकांनी वेळेपूर्वी नावनोंदणी करून शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

रुग्णांनी यापूर्वी केलेल्या वैद्यकीय तपासण्यांचे अहवाल, डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन, एक्स-रे, सोनोग्राफी किंवा इतर वैद्यकीय कागदपत्रे व आजारासंबंधीची फाइल असल्यास ती शिबिराच्या वेळी सोबत आणावी, जेणेकरून तज्ज्ञ डॉक्टरांना रुग्णाच्या आजाराचा पूर्वेतिहास समजण्यास मदत होईल.

शिबिराचे आयोजन श्रीमती कृतिबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिक, शिरपूर पीपल्स को-ऑप. बँकेच्या मागे, महाराजा कॉम्प्लेक्स, शिरपूर येथे करण्यात आले आहे. नागरिकांनी शिबिराच्या वेळेत उपस्थित राहून तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी व मार्गदर्शन करून घ्यावे.

शिरपूर शहरासह तालुक्यातील सांधेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, गुडघेदुखी, मणक्यांचे विकार व अन्य अस्थीविकारांनी त्रस्त नागरिकांसाठी हे शिबिर उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे नागरिकांनी मोठ्या संख्येने नावनोंदणी करून दि. २५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या मोफत आयुर्वेदिक आरोग्य तपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती कृतिबेन भूपेशभाई पटेल आयुर्वेद सिटी क्लिनिकच्या वतीने करण्यात आले आहे.

### स्वामी टेऊराम हायस्कूल साय.सुरक्षा जनजागृती

धुळे, दि. २४- माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आधारे विद्यार्थ्यांनी स्वतः सजग व्हावे आणि इतरांना साक्षर करावे, असे आवाहन धुळ्यातील स्वामी टेऊराम हायस्कूल मध्ये करण्यात आले. शहरातील शिवाजी विद्या प्रसारक संस्थेच्या डॉ.पा.रा. घोगरे सायन्स महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स क्लबच्या वतीने स्वामी टेऊराम हायस्कूलमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात आले. या अभियानास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### महाराष्ट्र शासन
### तहसिल कार्यालय, धुळे
### (जन्म मृत्यू शाखा)

ई मेल : tahsildardhule99@gmail.com — दुरध्वनी क्र. ०२५६२-२८८७२१

क्रमांक/ज.मृ.नों/कावि/६०३/२०२६ — दिनांक :- २४/०८/२०२६

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे न्यायालया अंतर्गत प्रसिद्धी नोटीस**

श्री.दिनेश आत्माराम येशी (ठाकूर)
पत्ता :- मौजे नेर ह.मु. मोहाडी उपनगर, ता.जि. धुळे. .....अर्जदार
विरूध्द
ग्रामपंचायत अधिकारी.
ग्रामपंचायत कार्यालय नेर, ता.जि.धुळे. .....जाबदेणार

श्री.दिनेश आत्माराम येशी (ठाकुर) रा.मौजे नेर ह.मु.मोहाडी उपनगर ता.जि. धुळे, यांनी इकडील कार्यालयास अर्ज सादर करून त्यांचा जन्म दि.०१/०६/१९७६ रोजी मौजे नेर ता.जि.धुळे येथे झाला असून संबधितांची जन्माची नोंद ग्राम पंचायत कार्यालय नेर ता.जि.धुळे येथे नसल्याने व सदरील जन्म हा एक वर्षा पुढील असल्याने महाराष्ट्र जन्म नोंद अधिनियम १९६९ चे कलम १३ पोट कलम ३ अन्वये जन्म नोंद होणे कामी जन्म आदेश व तसे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी वरील प्रमाणे अर्जात नमुद केलेल्या माहिती विषयी कोणाची काही एक हरकत असल्यास अथवा खुलासा दयावयाचा/मांडावयाचा असल्यास त्यांनी दि.१५/०९/२०२६ रोजी ठीक सकाळी ११.०० वा पावेतो तहसिल कार्यालय धुळे ग्रामीण (जन्म मृत्यू नोंद शाखा) येथे स्वत: अगर प्राधिकृत प्रतिनिधी मार्फत हजर राहून लेखी हरकत सादर कराव्यात. त्यानंतर आलेल्या हरकती गृहीत धरण्यात येणार नाही व सदर अर्जाबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस तहसिलदार धुळे ग्रामीण यांचे सही शिक्यानिशी दि.२४/०८/२०२६ रोजी प्रसिध्दीस दिली असे.

**स्थळ- धुळे, दिनांक :- २४/०८/२०२६** — (शिक्का) **तहसिलदार धुळे ग्रामीण**

### जाहीर नोटीसीस हरकत (उत्तर)

प्रति,
**१.ॲड.सागर आर तापकिरे साहेब,**
रा.कदमबांडे नगर, आकाशवाणी केंद्राजवळ, देवपुर, धुळे.

ॲड.सागर आर. तापकिरे यांनी त्यांचे निनावी पक्षकार यांचे वतीने दि.२१/०८/२०२६ रोजी दैनिक आपला महाराष्ट्र या वर्तमानपत्रात दिलेल्या जाहिर नोटीसीस सक्त हरकत घेण्यात येते की,

यास आमचे पक्षकार **वजीऊद्दीन हिसामुद्दीन शेख वगैरे** रा.ह.मु. प्लॉट नं.१०७, गरीब नवाज नगर, बहारे मदिना मस्जीद व मदसरे जवळ, धुळे. यांनी दिलेल्या अधिकारावरुन जाहिर नोटीसीस हरकत घेण्यात येते की,

मौजे धुळे शहर येथील स.नं.४४१/१ पैकी प्लॉट नं.१०७ त्यास धुळे विस्तारीत सि.स.नं.१६१४४ अशी मिळकत व त्यावरील बांधीव घर व उर्वरीत बखळ जागा सदर मिळकत आमचे पक्षकार यांचे सख्खे भाऊ जन्नतनिवासी मुबीनोद्दीन हिसामुद्दीन शेख व त्यांची पत्नी म्हणजेच आमचे पक्षकार यांची वहिणी जन्नतनिवासी नसीमबानो मुबीनोद्दीन शेख यांचे नावे व मालकी हक्काची व ताबेउपभोगातील मिळकत होती. त्यांचे मृत्युपश्चात मयताचे वारस म्हणून मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो., धुळे यांचे कडील दि.कि.अर्ज नं.१०३६/२०२३ अन्वये मे.न्यायालयाने मयताचे वारस म्हणुन आमचे पक्षकार व त्यांचे इतर भाऊ व बहिनी म्हणजेच मयताचे सर्व भाऊ, बहिनी यांना वारस ठरविले असून, त्या अन्वये नमुद मिळकतीवर आमचे पक्षकार व त्यांचे भाऊ बहिनी हे कायदेशीर वारस होते व आहेत. सदर मिळकत त्यांचे वारस मालकी हक्काला व ताबेउपभोगात आलेली होती व आहे.

आपण बोगस दस्तान्वये नमुद मिळकतीच्या उताऱ्यावर लावून घेतलेले नावाच्या विरुध्द आमचे पक्षकार यांनी मा.जिल्हा अधिक्षक सो., भुमी अभिलेख धुळे यांचे न्यायालयात सि.टी.एस. अपिल नं.१७५२/२०२४ दाखल केले असून, त्याचा निर्णय आमचे पक्षकार यांचे लाभांत लागलेला आहे. सदर अपिल निर्णयानुसार अकिल अहमद एकबाल यांच्या नावांची बेकायदेशीर फेरफार नोंद नं.३१७३५ दि.२३/११/२०२३ ही नोंद रद्द करुन आमचे पक्षकार यांचे कायदेशीर वारस म्हणून मिळकतीच्या उताऱ्यावर मालक सदरी वारसांचे नावांची नोंद करण्याचे आदेश पारीत झालेले आहे. त्यानुसार सदर मिळकतीचे सिटी सर्व्हे उताऱ्यावर अकिल अहमद एकबला यांची बेकायदेशीर नोंद रद्द झाली असून, फेरफार नोंद नं.४१९३५ अन्वये आमचे पक्षकार **वजीऊद्दीन हिसामुद्दीन शेख वगैरे** योग्य मालकांचे नाव दाखल झालेले आहे.

तरी आपले निनावी पक्षकार करीत असलेले बेकायदेशीर कृत्याच्या विरुध्द लवकरच आमचे पक्षकार सक्षम न्यायालयात फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करणार असुन, मे.पोलीस प्रशासन तसा अर्ज देखील दिलेला आहे.

तरी या नोटीसीने आपणास व आपणास निनावी पक्षकार यांचेसोबत व्यवहार करण्यास इच्छुक असलेले व आपण मिळकतीवर विक्री कामी आणत असलेले निनावी गिऱ्हाईक यांना कळविण्यात येते की, आपण अकिल अहमद एकबाल यांचेकडे कुठल्याही स्वरुपाचा नमुद मिळकतीबाबत व्यवहार करु नये, तसेच कुणीही सदर अकिल अहमद एकबाल यांचे सोबत कुणीही वर नमुद मिळकतीबाबत कुठलाही स्वरुपाचा खरेदी, विक्री अगर काहीएक स्वरुपाचा व्यवहार करु नये, तसे काही केल्यास सदर व्यवहार आमचे पक्षकार यांचेवर बंधनकारक राहणार नाही. तसेच त्यामुळे निर्माण होणाऱ्या सर्व प्रकारच्याकायदेशीर कार्यवाहीस आपण व संबंधित जबाबदार रहाल, कृपया याची नोंद घ्यावी. लवकरच सदर प्रकरणी आपणास प्रत्यक्ष कार्यवाही व नोटीस देण्यात येईल.

सदरची नोटीस आमचे अशिलांनी दिलेल्या माहितीनुसार, सांगितलेवरुन व दिलेल्या अधिकारानुसार प्रसिध्दीस देण्यात येत आहे. दि.२४/०८/२०२६.

**ॲड.संतोष दत्तात्रय ठाकूर**
पत्ता- शॉप नं.१ ते ४, ठाकूर कॉम्प्लेक्स, जि.प.समोर, स्टेट बँक मुख्य शाखेजवळ, एल.आय.सी.ची. बोळ, धुळे.
**मो.नं.९०९६०६७१८८**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व सबंधीतांना या जाहिर नोटिसीनी कळविण्यात येते की मौजे देवपुर स.नं.१०४ मधील प्लॉट नं.२३ चे क्षेत्र ४८७.७३ चौ.मी. यापैकी सामाईकातील अविभक्त पश्चिमे कडील भागापैकी उत्तरे कडील भागाचे क्षेत्र १६२.५३ चौ.मी. यासी विस्तारीत हद्दीतील सि.स.नं.६८४९ चे क्षेत्र ४८० चौ.मी यापैकी सामाईकातील अबिभक्त उत्तरे कडील भागाचे क्षेत्र १५७.०५ चौ.मी. बखळ प्लॉट यासी चतुसीमा खालील प्रमाणे...

पुर्वेस- याच प्लॉट नं.२३ पैकी उर्वरित भाग,
पश्चिमेस- वापर व रस्ता,
दक्षिणेस- याच प्लॉट नं.२३ पैकी उर्वरित भाग,
उत्तरेस- प्लॉट नं.९.

येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत ही श्री.आचल राजेंद्र बंब रा. सुभाष नगर जुने धुळे ता.जि.धुळे यांच्या मालकी व ताबे व कब्जे उपभोगातील असून सदर मिळकत त्यानी कायमस्वरूपी खरेदी खतान विकण्याचा तोंडी सौंदा आमचे पक्षकारा सोबत केला असून आमचे पक्षकार लवकरच सदर मिळकतीचे खरेदीखत मा दुय्यम उपनिंबधक धुळे यांच्या कार्यालयात नोंदविणार आहे.

सबब, या जाहिर नोटिसीनी सर्व संबधिताना कळविण्यात येते की, वर नमूद वर्णनाच्या मिळकतीबाबत वर नमुद मिळकत मालकांशी कोणाचाही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, तारण, गहाणखत, सौदा, लिज, भाडेकरार, बक्षिसपत्र, जनरल अगर स्पेशल मुखत्यार इ. कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर हरकत व तक्रार असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाच्या खाली नमुद पत्यावर योग्य त्या कागदपत्रा सहीत लेखी स्वरूपात नोंदव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही कोणत्याही प्रकारच्या लेखी हरकती अगर म्हणणे न आल्यास सदर मिळकती हया निर्वेध व निर्बोज असल्याचे समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तसेच वर नमुद मुदती नंतर आलेल्या अगर परस्पर वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करून घेतलेल्या हरकती आमच्या पक्षकारा वर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटिस आमच्या पक्षकाराने सांगितल्यावरून आज रोजी आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. धुळे, दि.२४/०८/२०२६.

**ॲड.राहुल सुभाष शिकारे**
१५, रामचंद्र नगर पारोळा रोड, धुळे. **मो.नं.९४२२२१७८६७**

### CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**NAZIYA PARVEEN BI BINTE SAYYED LIYAQAT ALI**
MY NEW NAME IS
**NAZIYA PARVEEN SAJID KHAN**
ADD- MULLA WADA LANE NO.2, HOUSE NO.3360, DHULE-424001.

### CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**TAHSEEN RAZA NASEEB ALI**
MY NEW NAME IS
**TAHSEEN RAZA NASEEB ALI SAYYAD**
ADD- PLOT NO.3, CHALISGAON ROAD, AAYESHA COLONY, DHULE.

### CHANGE NAME

MY OLD NAME WAS
**RUKHSAR BI SHAIKH RASHID**
MY NEW NAME IS
**RUKHSAR SHARIF PINJARI**
ADD- AGRA ROAD SONGIR, TAL.DIST. DHULE (M.S.)

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की:

१. माझे पक्षकार १) श्री.हाजी मुख्तार अहमद मो. रमजान (पती) व २) सौ.सुमैय्याबानो मुख्तार अहमद (पत्नी), दोघे रा.कबीर गंज, हबीबी स्कूलजवळ, वडजाई रोड, धुळे हे खाली नमूद मिळकतींचे अनुक्रमे स्वतंत्र व अनन्य कायदेशीर मालक व अधिकृत भोगवटादार आहेत:

* मिळकतीचा तपशील- १ (पतीच्या नावे) : घर नं.२२१, सी.टी. सर्व्हे नं. ३७७, आझाद नगर, अकबरी मशिदीजवळ, धुळे. धुळे महानगरपालिका मालमत्ता क्र.**D9A- 874** (जुना क्र.**W2ZCB77000711**). महापालिका कर पावतीनुसार अधिकृत नोंद: श्री मुख्तार अहमद रमजान.

* मिळकतीचा तपशील- २ (पत्नीच्या नावे): आझाद नगर, धुळे येथील संलग्न निवासी मिळकत. धुळे महानगरपालिका मालमत्ता क्र.**D9A-875** (जुना क्र. **W2ZCB77000712**). महापालिका कर पावतीनुसार अधिकृत नोंद: श्री सुमैय्याबानो मुख्तार.

२. वरील दोन्ही मिळकती या माझ्या पक्षकारांनी स्वतःच्या वैध व स्वकष्टार्जित कमाईतून विकत घेऊन निर्माण केलेल्या आहेत. दोन्ही मिळकतींचा महानगरपालिका कर, पाणीपट्टी व इतर सर्व वैधानिक देयके माझे पक्षकार स्वतः नियमितपणे भरत आहेत.

३. माझे पक्षकार यांचा मुलगा **अतिकुर्रहमान मुख्तार अहमद** व सून **सौ. मुबश्शेरा बानू अतिकुर्रहमान** हे माझे वृद्ध पक्षकार दाम्पत्यास शारीरिक व मानसिक त्रास, मारहाण व शिवीगाळ करत असून, त्यांनी माझ्या पक्षकारांच्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन वरील दोन्ही मिळकतींचा **(D9A-874** व **D9A-875)** बेकायदेशीररीत्या ताबा बळकावला आहे.

४. त्यामुळे माझे पक्षकार यांनी मुलगा अतिकुर्रहमान व सून मुबश्शेरा बानू यांना त्यांच्या उपद्रवी व छळवादी वागणुकीमुळे आपल्या कुटुंबातून, नात्यागोत्यातून तसेच वरील दोन्ही स्वकष्टार्जित मिळकतींसह सर्व चल-अचल संपत्तीतून पूर्णपणे बेदखल **(Disown)** केले आहे. तसेच त्यांना सदर घरांमध्ये राहण्यासाठी दिलेली तात्पुरती परवानगी **(License)** कायदेशीररीत्या संपुष्टात आणलेली आहे.

५. सबब, या नोटीशीद्वारे सर्व बँक, पतसंस्था, वित्तीय संस्था, खाजगी सावकार, व्यापारी व सर्वसामान्य जनतेस सावध करण्यात येते की:

* वरील दोन्ही मिळकतमध्ये (मालमत्ता क्र.**D9A-874** व **D9A-875**) मुलगा अतिकुर्रहमान किंवा सून मुबश्शेरा बानू यांचा कसलाही कायदेशीर मालकी हक्क, हिस्सा, वारसा हक्क किंवा वित्तीय अधिकार अस्तित्वात नाही.

* सदर व्यक्तींशी कोणीही वरील मिळकतींच्या तारणावर, खरेदी-विक्री, भाडेपट्टा, गहाणखत किंवा इतर कोणताही आर्थिक अथवा व्यावसायिक व्यवहार केल्यास, त्यास माझे पक्षकार किंवा त्यांच्या मिळकती कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

* असा कोणताही अनधिकृत व्यवहार झाल्यास तो माझ्या पक्षकारांवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक नसेल व होणाऱ्या सर्व आर्थिक व कायदेशीर नुकसानीस संबंधित व्यवहार करणारी व्यक्ती स्वतः जबाबदार राहील.

सदर नोटीस माझ्या पक्षकारांच्या सांगण्यावरून व माहितीवरून प्रसिद्ध केली असे. स्थळ- धुळे, दिनांक- २४/०८/२०२६.

**ॲड.राजेंद्र काशिनाथ निकुंभ**
वकील, जिल्हा व सत्र न्यायालया, धुळे.
**मो.नं.७५८८३१८७७७**

### जाहीर नोटीस

ॲड.ओ.आय.खटवणी

**धुळे येथील मे.जिल्हा न्यायाधीश सो., यांचे कोर्टात**
दिवाणी किरकोळ अर्ज नं.१११/२०२५

भाग्यश्री अरूण जगताप (मतीमंद दिव्यांग)
तर्फे पालनकर्ती जन्मदात्री आई
सौ.बेबीबाई अरूण जगताप ....अर्जदार
विरूध्द
कोणीही नाही ....जाबदेणार

तमाम जनतेस सुचित करण्यात येते की, ज्याअर्थी भाग्यश्री अरूण जगताप ह्या दिव्यांग मुलीची कायदेशीर पालक नियुक्तीसाठी पालनकर्ती जन्मदात्री आई सौ.बेबीबाई अरूण जगताप हिने धुळे जिल्हा न्यायालयात गार्डियन ॲक्ट अन्वये दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१११/२०२५ चे प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविण्या- करीता पुढील चौकशी तारीख २४/०९/२०२६ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी हितचिंतक वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद, हरकत, तक्रार, आक्षेप असल्यास धुळे येथील मे.जिल्हा न्यायाधिश सो. कोर्ट नं.अव-हेल ऊा-२ यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही कोणतीही हरकत आली नाही तर सदर कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

धुळे, दिनांक- २१/८/२०२६

आदेशावरून

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय धुळे**






* धुळे, दि. २४- शहरात महिलांच्या सुरक्षिततेसाठी सी.सी.टी.व्ही.कॅमेरे सर्वच ठिकाणी लावण्यात यावे. चोरीच्या घटनांमध्ये वाढ, चेन स्नॅचिंगच्या घटनांना आळा बसवा यासाठी केवळ विशिष्ट ठिकाणी नव्हे तर सर्वच ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात यावे. अशी मागणी महिलांमधून जोर धरू लागली आहे.


प्रकाश में आज कहर




सनी देअल सुनिल शेट्टी सोनाली बेन्द्रे अरमानकोहली दीप्ती भटनागर परेशरावल राजबब्बर रंभा गुलशन ग्रोवड

# अध्यात्म धागा : भुपेशभाई

आजकल या आभाषी जगातली वेगवेगळी छायाचित्रे पाहुन माणुस पुलकीत होत नाही. पण हातात टाळ घेवुन भजन किर्तनात रंगलेल्या भुपेशभाईंचा फोटो जेंव्हा मी बघितला तेंव्हा मात्र त्यातले अस्सल भाव पाहुनच स्वतः भजनात रंगुन

विठु माऊली तू
माऊली जगाची

असा अभंग आपसुकच मी गुणगुणु लागलो होतो.

ही ताकद त्या टाळची,त्या फोटोची की भुपेशभाई नावाच्या माणसाच्या वलयाची?

असा प्रश्न मला पडला.

पण पुढच्याच क्षणी जाणवले की हा परीपाक त्या चेहऱ्यावरच्या भक्तीरसात रंगलेल्या अस्सल भाव भावनांचा आहे.

बेगडी भक्ती लगेचच लक्षात येते,परंतु भुपेशभाईंच्या अध्यात्म वाटचालीला मी अधुन मधुन पाहत असतो, त्यांच्या या भक्तीच्या मांदियाळीत दुरुनच कोपऱ्यातुन सामील होत असतो. प्रभु बालाजीच्या रथ यात्रेत आपल्या ताकदीने रथ ओढला जाणार नाही ही जाणीव असली तरी मी भक्तीभावाने सर्व भाविकांसोबत मी त्या दोराला हात लावतो. चार पावलं का असेना,रथ ओढल्याचे



समाधान मिळते. अगदी तसच गायत्री परीवारात

ओम भुर्भुःवस्वः चा मंत्र जाप करतांना किंवा स्वाहा।।.स्वाहा।।. म्हणत यज्ञकुंडात समिधा वाहतांना मला आनंद होतो.

हा सर्व भुपेशभाईंच्या अध्यात्म सेवेचा संस्कार आहे. राजकारणातला हा माणुस अध्यात्मात रंगलेला आम्ही पाहतो. भारतीय संस्कृतीची पताका खांद्यावर वाहुन तिचा जयजयकार करणारा आम्ही पाहतो तेंव्हा जो आनंद होतो तो औरच असतो, या अर्थाने भुपेशभाई मला भावतात.

जे जे ऊन्नत्त ऊदात्त असते
जेथे स्वच्छ मन असते
जेथे डोळस अध्यात्म भाव असतो
तेथे आम्ही नतमस्तक होत असतो,

याची प्रचिती भुपेशभाईंमध्ये मी पाहतो म्हणुनच त्यांचे बद्दलचा आदर दुणावतो.

या अध्यात्म शक्तीचा,
या भक्ती भावाचा,
या भारतीय संस्कारांचा,
निस्पृह सेवाभावाचा
संचार भुपेशभाईंमध्ये व कृतीबेन मध्ये आहेत.

म्हणुनच परीसरातली मंदिरे असो,समाजभवने असो,विविध लोकांसाठी सुखसुविधा असो यांत शिरपुर तालुका अग्रेसर आहे. एकाद्या मंदिराचा जीर्णोध्दार करुन त्यांना पुनर्जिवित करावे ते भाईंनीच ! नागेश्वर मंदिर असो,गायत्री मंदिर असो,गोरक्षनाथ मंदिर असो या सारखे प्रकल्पांमध्ये भुपेशभाईंची कल्पकता पाहायला मिळते.

यासाठी सुसंस्कारांचे अधिष्ठाण लागते.घरुनच साथ लागते,द्वेता सारख्या कन्येची पाठबळ लागते आणि अर्थातच अमरीषभाईंसारख्या खंबीर नेतृत्वाची छत्रछाया लागते. मुळातच पप्पाजी,मम्मीजी यांच्या पासुन अध्यात्माची गोडी त्यांना आहे,त्यात कृतीबेन सारख्या सहधर्मचारीणीची साथ असल्याने भुपेशभाई अध्यात्माचा धागा बनले आहेत.

या धाग्यात किती तरी भक्त,किती तरी भाविक व कित्ती तरी माणसं जुळलेली आहेत.

ज्योतसे ज्योत जगाते चलो
प्रेमकी गंगा बहाते चलो

असे गीत गात अवघा तालुका भक्तीमय होतो.

जगाला माळ दिसते,हार दिसतो परंतु कुणी तरी मजबुत धागा असतो म्हणुनच त्याची शोभा वाढते.अखंडत्व,चीरस्मरणीय व मजबुती त्याला प्राप्त होते.

म्हणुन या भक्तीरसाच्या या भुपेशभाई नावाच्या अध्यात्म धाग्यास वाढदिवसाच्या लक्षलक्ष शुभेच्छा

**-एम.के. भामरे बापु**
शिरपूर, मो.९८५०५१५४२२






## हार्दिक अभिष्टचिंतन

मा. भूपेशभाईंना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!

मा.भुपेशभाई पटेल
माजी उपनगराध्यक्ष



मा.यशवंतराव परशराम बावीस्कर (चेअरमन)

* शुभेच्छूक *



मा. अशोकबापू कलाल (व्हा. चेअरमन)

श्री.हिंमत सिताराम धनगर, श्री.सत्तारसिंग दुर्गा पावरा, श्री.रतिलाल शामराव माळी
श्री.नारायण कोदुसिंग राजपूत, श्री.दिपक देविदास गुजर, सौ.बारी रजनी सुभाष
सौ.प्रेमलता संग्रामसिंग राजपूत, सर्व कर्मचारी वृंद

**अमोदा परिसर तेलबिया उत्पादक सह संस्था शिरपूर, जि. धुळे.**



## हार्दिक अभिष्टचिंतन

*मा. भूपेशभाईंना वाढदिवसाच्या लाख लाख शुभेच्छा!*

मा.भुपेशभाई पटेल
माजी उपनगराध्यक्ष



मा.चिंतनभाई पटेल
नगराध्यक्ष

मार्गदर्शक



आ.अमरीशभाई पटेल
माजी शालेय शिक्षण मंत्री, महा.राज्य

शुभेच्छूक

श्री.हासवाणी नितीन घनश्यामदास (चेअरमन)
सौ.पाटील वैशाली भागवत (संचालिका)
श्री.ठाकरे गोपाल उखा (संचालक)
श्री.माळी किशोर जगन्नाथ (संचालक)
श्री.जाधव सचिन रमणलाल (संचालक)
श्री.चावडा मुकेश मोतीलाल (संचालक)
श्री.महाजन प्रशांत तुकाराम (व्हा.चेअरमन)
सौ.नाईक स्मिता जयंतराव (संचालिका)
श्री.सोनार गणेश राजाराम (संचालक)
श्री.झवर लक्ष्मीकांत रामवल्लभ (संचालक)
श्री.परदेशी महेंद्रसिंग भिमसिंग (संचालक)
श्री.सतिषभाऊ काबरा (व्यवस्थापक)

**प्रियदर्शनी प्रकाशन संस्था, शिरपूर.**

## दि शिरपूर पिपल्स् को-ऑप. बँक लि.,शिरपूर

महाराजा कॉम्प्लेक्स, मेनरोड, शिरपूर-४२५४०५ जि.धुळे.

आमचे लाडके नेते मा.नगराध्यक्ष मा.भूपेशभाई पटेल यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



मा.भुपेशभाई पटेल



मा.जयश्रीबेन पटेल

मार्गदर्शक



आ.अमरीशभाई पटेल



मा.चिंतनभाई पटेल
नगराध्यक्ष



आमचे मार्गदर्शक
मा.राजगोपालजी भंडारी



अध्यक्ष
मा.श्री.योगेश भंडारी



उपाध्यक्ष
मा.श्री.श्रेणिक जैन

✻ संचालक मंडळ ✻

मा.श्री.भुपेश अग्रवाल, मा.श्री.संजय चौधरी, मा.श्री.बाबुलाल महाजन, मा.श्री.दिलीप पटेल, मा.श्री.जितेंद्र पोतदार, मा.श्री.संजय सुराणा, मा.श्री.कमलेश अग्रवाल, मा.श्री.गणेश साळुंखे, मा.सौ.वैशाली पाटील, मा.सौ.कल्पना राजपूत, मा.श्री.मोतीलाल माळी, मा.श्री.बिपीन तेले, मा.श्री.श्रीकेश व्ही.राठी, मा.श्री. बी. जे. पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी)

✻ अत्याधुनिक सेवा सुविधांनी सुसज्ज ३६५ दिवस बँकींग सेवा देणारी बँक ✻

शाखा - शिरपूर, धुळे, जळगाव व नाशिक : सोमवार ते शुक्रवार सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत
शाखा - चोपडा, अमळनेर, भुसावळ व शहादा : सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत
सर्व शाखा : शनिवार, रविवार तसेच सार्वजनिक सुटीच्या दिवशी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत.

**बँक सुविधा :** * इन्फोसिस ह्या कंपनीचे कोअर बँकींग सोल्युशन (CBS) सॉफ्टवेअरचा सुरुवातीपासून वापर करणारी बँक * ठेवींवर आकर्षक व्याजदर * स्टॅम्प फ्रॅकींग सेवा शिरपूर व धुळे शाखांमध्ये उपलब्ध * सर्व साईजमध्ये लॉकर्स उपलब्ध * ऑनलाईन NEFT/RTGS सुविधा * पॅन ॲप्लीकेशन व टी.डी.एस. अपलोड सेवा उपलब्ध * ATM कार्ड संपूर्ण भारतात सर्व बँकांच्या ATM वर चालते तसेच इतर बँकांचे कार्ड देखील आमच्या बँकेच्या ATM वर चालते. * मोबाईल बँकींग सुविधा * जनरल इन्शुरन्स सुविधा.

✻ कर्जावरील आकर्षक व्याजदर, तत्पर कर्ज विवरण सेवा ✻

शाखा विस्तार-शिरपूर-महाराजा कॉम्प्लेक्स, मेनरोड, शिरपूर जि.धुळे फोन:०२५६३-२५७१७३, २५६२७१, २५११०९. *धुळे-१२४७/अ, भटस्मृती शेजारी, खोलगल्ली, धुळे फोन:०२५६२-२८०७८५, २८०५८५.*जळगांव-प्लॉट नं.२,जी.एस. ग्राऊंड शेजारी, विसनजी नगर, जळगाव जि.जळगाव फोन: ०२५७-२२२७२३६,२२३५३८२. *नाशिक-३/४,श्री गुरुदेव टॉवर, वसंत मार्केटसमोर, गंगापूर- शरणपूर लिंक रोड, कॅनडा कॉर्नर, नाशिक फोन: ०२५३-२३११४०९, २२३२४०९.*अमळनेर-मुख्य पोस्ट ऑफीससमोर, अमळनेर जि.जळगाव फोन:०२५८७-२२२१७३.*चोपडा- मेनरोड, चोपडा जि.जळगाव फोन:०२५८६-२२०२७७.*भुसावळ-डॉ.रोटे बिल्डींग, बंटी प्लॉट, जामनेर रोड, भुसावळ जि.जळगाव फोन:०२५८२-२२७०२२*शहादा-दुकान नं.१,२,३,पुरुषोत्तम मार्केट, बसस्टॅण्डसमोर, शहादा जि.नंदुरबार फोन:०२५६५-२२३१७३


## सातपुड्यातील शेतकरी वळतोय सुगंधित भातशेती कडे; दर्जेदार वाणाची निवड

**मोलगी, दि.२२ (प्रतिनिधी)- अक्कलकुवा तालुका हा अतिदुर्गम भागात व बहुतांश डोंगर दरीत वसलेला असून पारंपारिक भात लागवडी नंतर सातपुड्यातील शेतकरी वळतोय आता सुगंधित व अधिक उत्पन्न देणाऱ्या भातशेती कडे वळू लागला आहे. त्यासाठी दर्जेदार वाणाची निवड करून चांगले उत्पन्न घेण्याचा ध्यास शेतकऱ्यांनी घेतला आहे.**

या तालुक्यातील नागरिकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती. येथील शेती ही पावसाच्या भरवशावर होणारी व कमी उत्पन्न देणारी शेती म्हणून सर्वदुर परिचित आहे. डोंगराळ परिसर व खडकाळ जमीन ही या परिसरातील खरी ओळख आहे. या जमिनीवर येथील शेतकरी बांधव वर्षानुवर्षापासून पारंपारिक शेती कसत आले आहेत. अतिदुर्गम भागात पारंपारिक पद्धतीने पारंपारिक भाताचे बियाणे फोकुन भाताची पेरणी केली जातेय मात्र बदलत्या काळात वेळोवेळी मिळत असणारे मार्गदर्शन आणि सुविधांमुळे मात्र आता काळानुरुप शेती व्यवसायात बदल होत असतांना दिसु लागलाय. थोड्या फार प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे अतिदुर्गम भागातील शेतकरी आता मात्र सुगंधित व अधिक उत्पन्न देणाऱ्या भाताच्या लागवडीकडे वळला आहे. दहेलचा काही परिसर तसेच ओघानी, पिंपळखुटा या परिसरात थेट मातीची चिखल मशागत करुन शेतकरी भाताच्या रोपांची लावणी करत आहे. ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता शक्य आहे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर जागोजागी भाताची लावणी करण्यात शेतकरी व महिला व्यस्त झाले आहेत. या परिसरात साधारणतः जुलै महिन्याच्या उत्तरार्धात भाताची लागवड केली जाते. मात्र या वर्षी पुरेसा व दमदार पाऊस पडला नसल्याने ही लागवड ऑगस्ट महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात सुरु झाली आहे. विशेष म्हणजे काही शेतकरी हे स्वतःच्या शेतातच भाताची रोपे तयार करीत आहेत. त्यामुळे दर्जे दार बियाण्याचा वापर करुन तयार केलेली रोपे अधिक उत्पन्न देतात.

बदलत्या काळात सातपुड्याच्या शेतीत सातपुड्यातील शेतकऱ्यांनी काळानुरुप केलेला हा बदल सुखावणारा आहे.

## शेतकऱ्यांसाठी नंदुरबारात एकदिवसीय मेळावा

नंदुरबार, दि.२४(प्रतिनिधी)- सेल्को फाउंडेशन आणि कृषी विज्ञान केंद्र, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली नंदुरबार जिल्ह्यात हवामान अनुकूल उपजीविकेला प्रोत्साहन देण्यासाठी शेतकरी व स्वयंसहायता गटातील महिलांसाठी एकदिवसीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. पी. जी. रिसॉर्ट येथे झालेल्या या मेळाव्याला शेतकरी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.मेळाव्यास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी मिताली सेठी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, नाबार्डचे रवींद्र मोरे, कृषी विज्ञान केंद्र, नंदुरबारचे प्रमुख राजेंद्र दहातोंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.मेळाव्याच्या पहिल्या सत्रात शेतकरी आणि महिलांना कृषी प्रक्रिया, मूल्यवर्धन तसेच सूक्ष्म उद्योग उभारणीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## चक्करबर्डी परिसरात वडार समाजाचा मेळावा

धुळे, दि.२४- वीर-वडार एकता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष विजय गोरे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण महाराष्ट्रात वडार समाजाचे मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने धुळे शहरातील चक्करबर्डी परिसरात वडार समाजाचा भव्य मेळावा उत्साहात संपन्न झाला. यावेळी समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून शासनाकडे विविध मागण्या करण्यात आल्या.विजय गोरे यांनी सांगितले की, वडार समाजाचा इतिहास हा महाराष्ट्राच्या शिल्प, स्थापत्य आणि बांधकाम परंपरेशी जोडलेला आहे. पंढरपूर येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील मूर्ती तसेच रायगड किल्ल्यासह सुमारे साडेतीनशे किल्ल्यांच्या बांधकामात वडार समाजाचे योगदान राहिले आहे.

पान १ वरुन

## राजस्थानातील प्रोसेस सेंटर सुरू करा

आली. त्यानंतर जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर निदर्शने करून पावरलूम उद्योग व त्यावर अवलंबून असलेल्या कामगारांचा रोजगार वाचविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. या बैठकीस पावरलूम ओनर असोसिएशनचे अध्यक्ष मुस्ताक गांधी, हाजी इरफान शेठ, हारून शेठ, मुन्ना शेठ, निसार शेठ, छोटू शेठ, रज्जू शेठ, अख्तर शेठ, शकील अकील पैलवान, फरहान शेठ यांच्यासह पावरलूम उद्योगाशी संबंधित उद्योजक प्रतिनिधी उपस्थित होते. इचलकरंजी, भिवंडी, नागपूर, विटा, कोल्हापूर, मालेगाव आणि धुळे आदी भागांतील यंत्रमागांवर तयार होणारे कच्चे कापड प्रक्रिया करण्यासाठी राजस्थानात पाठविले जाते. मात्र, प्रोसेस सेंटर बंद असल्याने कच्च्या मालाची प्रक्रिया रखडली आहे. परिणामी उत्पादनाची साखळी विस्कळीत होऊन यंत्रमागधारक, व्यापारी, कामगार आणि या उद्योगाशी संबंधित अन्य घटक आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतीनंतर मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या कापड व यंत्रमाग उद्योगावर लाखो कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. केंद्र व महाराष्ट्र शासनाने राजस्थानातील बंद प्रोसेस सेंटर पुन्हा सुरू करण्यासाठी योग्य तो मार्ग काढावा आणि यंत्रमाग उद्योगाशी संबंधित लाखो कामगारांचा रोजगार पूर्ववत करण्यासाठी तातडीने ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन व पाठपुराव्यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष हाजी साबीर, रमेश श्रीखंडे, गोपाल अन्सारी, मुजफ्फर हुसेन, अफसर पठाण, शकील अहमद अन्सारी आदी उपस्थित होते.

## धुळे महानगरपालिका, धुळे

**पाणीपुरवठा विभाग- इ-निविदा सूचना क्र.८४ सन २०२६-२७**

मा.आयुक्त, धुळे महानगरपालिका, धुळे हे खालील कामाकरिता इ निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदार/संस्था/व्यक्तीकडून B1 पध्दतीने Percentage Rate नुसार निविदा दर मागविण्यात येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम |
|---|---|---|
| मनपा निधी अंतर्गत- (सन २०२६-२७) | | पहिली फेर निविदा (२ री वेळ) |
| १ | धुळे मनपा शाळा तसेच मनपा दवाखान्यामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा करणे | २४,९९,७१६/- |

उपरोक्त निविदेबाबतचा सविस्तर तपशिल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२५/०८/२०२६ सायं.१७.०५ वाजेपासून पहावायास मिळेल.

जा.क्र./धुमपा/पा.पु./१५/२०२६-२७
दिनांक- २४/०८/२०२६

उपायुक्त
धुळे महानगरपालिका, धुळे

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन:-** तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे देवपूर धुळे येथील स.नं.६१/१+२+३+४ पैकी प्लॉट नं.४५ यासी एकूण क्षेत्रफळ १८४ चौ.मी. सुमारे २००० चौ.फुट यामध्ये जुने ३० वर्षापुर्वीचे लोड बेअरींग घराचे बांधीव क्षेत्रफळ १५०० चौ.फुट व उर्वरीत बखळ जागेसह बांधीव मिळकत यासी सिटी सर्व्हे नं.४२०६ यासी क्षेत्र २०० चौ.मी. सत्ता प्रकार क यासी चतु:सिमा व मापे खालील प्रमाणे -:

| दिशा | मापे | चर्तुसीमा |
|---|---|---|
| पुर्वेस- | ५० फुट, | प्लॉट नं.४६, |
| पश्चिमेस- | ५० फुट, | प्लॉट नं.४४, |
| दक्षिणेस- | ४० फुट, | २५ फुट रस्ता, |
| उत्तरेस- | ४० फुट, | प्लॉट नं.४० |

येणे प्रमाणे चतु:सिमातील वर्णनाची मिळकत ही श्रीमती कल्पना पुनमचंद मोरे, श्री.अविनाश पुनमचंद मोरे व कविता पुनमचंद मोरे सर्व रा. प्लॉट नं.४५, आनंद नगर, दत्त मंदिर, भोई सोसायटी, देवपुर धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून यापैकी कविता पुनमचंद मोरे यांचा हिस्सा सोडून श्रीमती कल्पना पुनमचंद मोरे व श्री.अविनाश पुनमचंद मोरे यांच्या अविभक्त हिश्याची वरील नमुद मिळकतीचा त्यांनी आमचे अशिल यांच्याशी कायमस्वरूपी खरेदी विक्री करण्याबाबतचा व्यवहार केलेला असून मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिल यांच्याकडून बयाणा पोटी रक्कम स्विकारलेली असून व तसा सौदेकरार देखील आमचे अशिल यांच्या लाभात लिहून मे.नोटरी यांच्या समोर नोंदवून दिलेला आहे. आमचे अशिल लवकरच वरील मिळकती बाबत खरेदीखताचा पुढील व्यवहार मिळकतीच्या मालकांशी करणार आहेत.

तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदेकरार, कोणत्याही प्रकारचे करारनामे, बक्षीस, गहाण, दान, खावटीपोटगी, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यारपत्र, मृत्युपत्र, कोणत्याही प्रकारचे कर्ज, बोजे, ताबा किंवा ताब्या संदर्भात वाद, वाहिवाटी संदर्भात कोणत्याही प्रकारचा वाद, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी.

सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, निर्विवाद व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

सदरची नोटिस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- धुळे, दिनांक- २३/०८/२०२६.

**ॲड.परमेश्वर ए.चौधरी**
पत्ता- आधार कमल बंगलो, प्लॉट नं.४अ, नित्यानंद नगर,
निरायम हॉस्पिटल, मागे, ८० फुटी रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२३२८९१००**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच बँका, पतसंस्था, इतर वित्तीय संस्था, सरकारी, निमसरकारी संस्था व सावकार यांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन:-** तुकडी जिल्हा धुळे, पोट तुकडी तालुका धुळे पैकी मौजे न्याहळोद शिवारातील मिळकत नं. १) गट नं.१५०/१/अ/२ यासी क्षेत्रफळ ० हे. ६० आर यासी आकार ४ रु.६० पै. यावर सिंडीकेट बँक शाखा न्याहळोद व कॅनरा बँक न्याहळोद शखा यांचा पीक कर्जाचा बोजा असलेली शेत मिळकत. मिळकत नं.२) गट नं.१५०/१/अ/१ यासी क्षेत्रफळ ० हे ६६ आर यासी आकार ४ रु.६० पै. यामध्ये एक पक्की विहीर असून यावर सिंडीकेट बँक शाखा न्याहळोद व कॅनरा बँक शाखा न्याहळोद यांचा पीक कर्जाचा बोजा असलली शेत मिळकत. मिळकत नं.३) गट नं.१४७/१ यासी क्षेत्रफळ ० हे ९४ आर यासी आकार १ रु.६० यामध्ये एक विहीर असून त्या विहीरीवरुन हिस्से राशीने पाणी घेण्याचा हक्क तसेच यावर सिंडीकेट बँक, कॅनरा बँक न्याहळोद शाखा यांचा पीक कर्जाचा बोजा असलेली शेत मिळकत. वरील तीन्ही भोगवटा वर्ग-१ असलेल्या जिरायत शेत मिळकतीचे एकूण क्षेत्र २ हे.१४ आर. यासी चतु:सिमा गाव नकाशा प्रमाणे -:

येणेप्रमाणे चतु:सिमातील वर्णनाचीमिळकत ही श्री.दिलीप महादू चौधरी रा.न्याहळोद ता.जि.धुळे यांचे मालकी व ताबे उपभोगातील असून त्यांनी आमचे अशिल श्री.वाल्केश गणपत चौधरी, श्री.अमोल हिम्मत पाटील व श्री.क्षितीज भगवान महाजन रा.धुळे यांच्याकडून वरील मिळकतीच्या सौदयापोटी बयाणा म्हणून रक्कम स्विकारलेली आहे.

तरीही सदर वरील मिळकतीबाबत कोणाचेही कोणत्याही स्वरूपाचे सौदे, करार, बक्षीस, गहाण, दान, खावटीपोटगी, लिजडिड, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यार, मृत्युपत्र, बोजे, ताबा, अथवा इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क व अधिकार इतर तबदिलीचे व्यवहार असतील तर सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील पत्यावर पुराव्यानिशी मुळ कागदपत्रांसह लेखी हरकत घ्यावी.

सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती सदर मिळकतीवर व आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकती देखील विचारात घेतल्या जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. तसेच दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्बोज, निर्विवाद व हस्तांतरणीय आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीबाबत खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. सदरची नोटिस आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व दाखविलेल्या कागदपत्रावरून व सांगण्यावरून आमचे मार्फत प्रसिध्दीस दिली असे. ठिकाण- धुळे, दिनांक- २३/०८/२०२६.

**ॲड.परमेश्वर ए.चौधरी**
पत्ता- आधार कमल बंगलो, प्लॉट नं.४अ, नित्यानंद नगर,
निरायम हॉस्पिटल, मागे, ८० फुटी रोड, धुळे-४२४००१.
**मो.नं.९४२३२८९१००**


संस्थापक / अध्यक्ष



आ. अमरीशभाई पटेल
(माजी शिक्षणमंत्री)

**मा.भूपेशभाईंना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**

**आर.सी.पटेल शैक्षणिक संकुल शिरपूर, जि. धुळे**

गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कास धरणारी व अल्पावधीत गरुडझेप घेणारी, राज्य शासनाचा उत्कृष्ट शैक्षणिक संस्था हा पुरस्कार मिळवणारी उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था.



मा.श्री.भूपेशभाई पटेल
(अध्यक्ष)



मा.जयश्रीबेन पटेल



मा.श्री.राजगोपालजी भंडारी
(कार्याध्यक्ष)

माजी उपनगराध्यक्ष- शिरपूर नगरपरिषद      कार्याध्यक्ष- दि शिरपूर एज्यु. सोसा.

## शिरपूर एज्युकेशन सोसायटी
## आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट, शिरपूर

-: संचालक मंडळ :-

मा.श्री.अमरीशभाई रसिकलाल पटेल (संस्थापक अध्यक्ष)
मा.श्री.भूपेशभाई रसिकलाल पटेल (अध्यक्ष)
मा.श्री.राजगोपाल चंदूलाल भंडारी (कार्याध्यक्ष)
मा.श्री.कमलकिशोर किसनलाल भंडारी (कार्याध्यक्ष)
मा.श्री.चिंतनभाई अमरीशभाई पटेल (कोषाध्यक्ष)
सर्व सन्मानतीय संचालक मंडळ

- श्री विलेपार्ले केळवणी मंडळ, मुंबई
- दि शिरपूर एज्युकेशन सोसायटी, शिरपूर
- मुकेशभाई आर. पटेल बॉईज ॲण्ड गर्ल्स मिलीटरी स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज (सायन्स), तांडे ता. शिरपूर
- मुकेशभाई आर. पटेल स्कूल (सी.बी.एस.ई.), तांडे ता. शिरपूर

पान १ वरुन

## मोदींचा तरूणांशी व्हर्च्युअल संवाद

राष्ट्रीय राजधानी दिल्लीत चार ते पाच ठिकाणी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. यात आयआयटी दिल्लीचाही समावेश असून केंद्रीय क्रीडा मंत्री मनसुख मांडविया तेथील कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षा पी. टी. उषा यांच्यासह देशातील विद्यमान व माजी खेळाडू तसेच आंतरराष्ट्रीय पदक विजेतेही युवकांशी संवाद साधणार आहेत. यामध्ये मनिका बत्रा, दीपा कर्माकर, सायना नेहवाल, गगन नारंग, पी. आर. श्रीजेश, मेरी कोम, बायचुंग भुतिया, पुलेला गोपीचंद, अंजू बॉबी जॉर्ज, कर्णम मल्लेश्वरी आणि मीराबाई चानू यांचा समावेश आहे. काही क्रिकेटपटूही या संवाद कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

## कांदा साठ रुपये किलो

दर यामध्ये मोठी तफावत असल्याची शक्यता आहे. त्यामुळे किरकोळ बाजारातील दरवाढीचा प्रत्यक्ष फायदा कांदा उत्पादक शेतकऱ्यांना कितपत मिळतो, हा प्रश्नही उपस्थित होत आहे.

अतिवृष्टीचा कांद्याला फटका

गेल्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीचा कांदा उत्पादनाला मोठा फटका बसला. काढणीच्या काळात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतातील कांदा सडला. त्यामुळे उत्पादनाबरोबरच कांद्याच्या गुणवत्तेवरही परिणाम झाला. परिणामी बाजारात चांगल्या दर्जाच्या कांद्याची आवक कमी झाली आहे. याशिवाय मागील काही वर्षांत कांद्याला अपेक्षित भाव न मिळाल्याने अनेक शेतकऱ्यांनी कांद्याचे लागवड क्षेत्र कमी केले. त्यामुळे काही भागांत स्थानिक उत्पादन घटले असून बाजारपेठेला बाहेरील आवकेवर अवलंबून राहावे लागत आहे.

लसूण, आलेही महागले

कांद्याबरोबरच लसूण आणि आल्याच्या दरातही लक्षणीय वाढ झाली आहे. लहान गाठीचा लसूण सध्या सुमारे दोनशे रुपये किलो, तर मोठ्या गाठीचा लसूण तीनशे रुपये किलोपर्यंत विकला जात आहे. अद्रकाचा दरही दीडशे रुपयांवरून थेट दोनशे रुपये किलो झाला आहे. एकीकडे या दरवाढीमुळे ग्राहकांच्या स्वयंपाकघराचे गणित बिघडले असले तरी दुसरीकडे बाजारातील मागणी आणि दराचा कल कायम राहिल्यास संबंधित पिकांच्या उत्पादक शेतकऱ्यांना काही प्रमाणात आर्थिक दिलासा मिळण्याची शक्यता आहे. मात्र, किरकोळ दरवाढीचा योग्य हिस्सा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरात पडण्यासाठी बाजारातील दररचना आणि मध्यस्थांची साखळी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

## मराठी शाळा वाचल्या असत्या

बारा टक्क्यांच्या आसपास असायचे. विद्यार्थ्यांची वाढती संख्या पाहता यात वाढ होणे अपेक्षित होते, मात्र गेल्या अनेक वर्षांत हा आकडा तेरा टक्क्यांपर्यंतही पोहोचू शकलेला नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

आश्रमशाळा मुलींच्या मृत्यूवर हळहळ

ग्रामीण भागातील शाळा आणि आश्रमशाळांमधील अपुऱ्या मूलभूत सुविधांवर बोलताना न्यायमुर्ती वराळे यांनी एका अत्यंत दुर्दैवी घटनेचा संदर्भ दिला. एका निवासी आश्रमशाळेत योग्य सुविधा नसल्यामुळे विद्यार्थिनींना जमिनीवर झोपावे लागले. तिथे साप चावल्याने तीन मुलींचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि एका मुलीवर अद्याप रुग्णालयात उपचार सुरू आहेत, असे सांगत त्यांनी प्रशासनाने मूलभूत सुविधांना प्राधान्य देण्याची गरज अधोरेखित केली.

मराठी शिक्षणाचा अभिमान

यावेळी न्यायमुर्ती वराळे यांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. दहावी पर्यंतचे शिक्षण महानगरपालिका आणि जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत झाल्याचे त्यांनी अभिमानाने सांगितले. प्रादेशिक भाषेतून शिक्षण घेतल्याने माझ्या करिअरमध्ये कधीही अडथळा आला नाही. उलट माझा दृष्टिकोन अधिक समृद्ध झाला. मराठी भाषेने मला इतरांकडे पाहण्याचा एक मोकळा आणि व्यापक दृष्टीकोन दिला. माझ्या भाषेने मला बंधुभावाची शिकवण दिली, असे सांगत त्यांनी संत ज्ञानेश्वर आणि कवी सुरेश भट यांच्या विचारांचा दाखला दिला.

## बोगस दारूसह बहात्तर ला.चा मुद्देमाल

धुळे) याचे ताब्यातील त्या ट्रक क्र. एमएच०८/एच-२१०९ बनावट विदेशी दारुचा साठा आढळला, विक्रीच्या उद्देशाने लपवून ठेवला असून तो हस्तगत करण्यात आला. ६२ लाख ८८ हजार रुपयांचा दारू साठा आहे. त्यात बनावट दारु भरलेल्या बाटल्यांची एकुण ६५५ खोकी आढळली. दहा लाख रुपयांचा ट्रक असा एकूण ७२ लाख ८८ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला.

मानवी जीवितास हानिकारक

मानवी जीवितास हानीकारक व विना बॅच, मॅन्युफॅक्चर क्रमांक व विक्री किंमत नसलेली बनावट विदेशी दारु विना परवाना, बेकायदेशीररित्या विक्रीच्या उद्देशाने साठा केल्याचे आढळले. साक्री पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम अन्वये गुन्हा दाखल झाला.

पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे, उपअधीक्षक सुधीर पाटील यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक श्री. ज्ञानेश्वर वारे, निरीक्षक दीपक वळवी (साक्री पोलीस ठाणे), सहायक निरीक्षक दीपक ढोके, उपनिरीक्षक अशोक वळवी, हवालदार तुषार सुर्यवंशी, पंकज खैरमोडे, राजीव गिते, सुशिल शेंडे, संजय शिरसाठ, शांतीलाल पाटील, दिनेश मावची, रोशन चित्ते, तुषार जाधव, विकास शिरसाठ, नारायण चव्हाण यांनी कारवाई केली.

## रणजितसिंह राजपूत धुळे..

कारकिर्दीत विविध क्षेत्रांत आणि पदांवर काम केले आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या एड्स नियंत्रण प्रकल्पात उपसंचालक (आयईसी), वडाळा, मुंबई, देना बँकेच्या बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स येथे व्यवस्थापक (जनसंपर्क) मंत्रालय, मुंबई येथील वृत्त शाखेत कार्य अधिकारी तसेच विभागीय माहिती कार्यालय, अमरावती व नाशिक येथे सहाय्यक संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. याशिवाय नाशिक, नंदुरबार व धुळे येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून त्यांनी काम केले आहे.शासकीय माहिती व जनसंपर्क व्यवस्थेला बदलत्या माध्यमविश्वाशी जोडण्यासाठी अभिनव प्रयोग करण्यावर श्री. राजपूत यांनी विशेष भर दिला आहे. राज्यातील पहिले मॉडेल जिल्हा माहिती कार्यालय व बहुमाध्यम केंद्र नंदुरबार येथे त्यांनी साकारले आहे. पारंपरिक प्रसिद्धी व्यवस्थेसोबत आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल माध्यमे आणि बहुमाध्यम सुविधांचा समन्वय साधण्याच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला.धुळे येथे राज्यातील पहिले माहिती व जनसंपर्क भवन उभारण्याची संकल्पनाही श्री. राजपूत यांची होती. शासकीय माहिती व जनसंपर्क यंत्रणेला स्वतंत्र, सुसज्ज आणि आधुनिक स्वरूप देणारी ही संकल्पना धुळे येथे प्रत्यक्षात साकारल्यानंतर शासनाने या संकल्पनेचा स्वीकार संपूर्ण राज्यासाठी केला.डिजिटल माध्यमांचा शासकीय जनसंपर्कासाठी प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीनेही श्री. राजपूत यांनी अभिनव प्रयोग केला. देशातील पहिले शासकीय डिजिटल साप्ताहिक यशार्थची संकल्पना आणि निर्मिती त्यांनी यशस्वीपणे प्रत्यक्षात आणली. या अभिनव कार्याची दखल घेत २०१८ मध्ये नागरी सेवा दिनानिमित्त धुळे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला होता.नंदुरबार येथे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून कार्यरत असताना आदिवासीबहुल जिल्ह्यातील विकासात्मक आणि सकारात्मक बाबींना व्यापक प्रसिद्धी देण्यासोबतच शासनाच्या विविध योजना व जिल्हा प्रशासनाच्या उपक्रमांची माहिती वृत्तपत्रे, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल आणि समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी विविध उपक्रम राबविले. धुळे जिल्हा माहिती अधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी श्री. राजपूत यांचे स्वागत केले. शासनाच्या योजना, धोरणे आणि निर्णयांची अधिकृत, वस्तुनिष्ठ व विश्वासार्ह माहिती नागरिकांपर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचविणे तसेच धुळे जिल्ह्यातील विकासात्मक, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सकारात्मक बाबींना आधुनिक माध्यमांच्या साहाय्याने व्यापक प्रसिद्धी देण्याला प्राधान्य राहील, असे श्री. राजपूत यांनी यावेळी सांगितले.

पान १ वरुन

## कॅन्सर रुग्णालय व संशोधन केंद्र सुरू करा

शासकीय कॅन्सर रुग्णालय सुरू करावे. रुग्णालयात कॅन्सर तपासणी, निदान, अत्याधुनिक शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिओथेरपी, इम्युनोथेरपी, पीईटी सीटी स्कॅन, एमआरआय, लिनियर एक्सिलरेटर, तसेच आवश्यकतेनुसार बोन मॅरो ट्रान्स्प्लांटसह सर्व आवश्यक सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

या कॅन्सर रुग्णालयाच्या मंजुरीसह उभारणीस लागणारा कालावधी लक्षात घेता प्राथमिक टप्प्यात टाटा मेमोरिअल सेंटर किंवा अन्य नामांकित कॅन्सर रुग्णालयांच्या तांत्रिक सहाय्याने शहरात तातडीने कॅन्सर ओपीडी डे केअर केमोथेरपी, कॅन्सर स्क्रीनिंग व फॉलोअप सेवा सुरू कराव्यात, अशी मागणी आमदार अग्रवाल यांनी केली.

आ.अग्रवाल यांनी सांगितले, की धुळे येथील कॅन्सर रुग्णालयाला भविष्यात उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक कॅन्सर केंद्र म्हणून विकसित करून कॅन्सर संशोधन व प्रशिक्षण केंद्र सुरू करावे. नर्सिंग, पॅरामेडिकल व तांत्रिक मनुष्यबळ प्रशिक्षणाच्या सुविधाही सुरू कराव्यात. महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजनेच्या माध्यमातून पात्र रुग्णांना जास्तीत जास्त उपचार सुविधा मोफत द्याव्यात, दूरवरून येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांसाठी सुसज्ज धर्मशाळा, अल्पदरात निवास, भोजन आदी सुविधा द्याव्यात, आदी मागण्याही त्यांनी केल्या.

अत्याधुनिक रुग्णवाहिका द्या

धुळे जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गांचे जाळे असून, जिल्हाभरातून रोज हजारो प्रवासी व मालवाहतुकीची वाहने ये-जा करतात. यात अनेकदा गंभीर अपघात झाल्याने आपत्कालीन स्थितीत गंभीर जखमींना काही मिनिटांत उपचारपूर्व सेवा त्यांचे प्राण वाचविण्यात निर्णायक ठरते. यासाठी जिल्ह्यात गरजेनुसार विशेषीकृत आधुनिक रुग्णवाहिकांचे स्वतंत्र नेटवर्क उभारावे. त्यासाठी भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह धुळे जिल्हा रुग्णालयास स्वतंत्रपणे सर्व सुविधा व यंत्रणांनी सज्ज आधुनिक रुग्णवाहिका व त्यासाठी प्रशिक्षित चालक, जीवनरक्षक उपकरणे, इंधन निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणीही आमदार अग्रवाल यांनी आरोग्यंत्री आबीटकर यांच्याकडे केली.

पान १ वरुन

## सर्वत्र सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसवा

प्रभाग क्र. ४ मध्ये सार्वजनिक शौचालय आणि बोरिंग करण्याच्या मागणीवर उत्तर देतांना प्रशासनाने सांगितले की, शौचालयाचे काम लवकर होईल; त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येईल. परंतु, बोरिंग अशाप्रकारे वॉर्डमध्ये करता येत नाही. शाळा, अंगणवाडी अशा ठिकाणी आवश्यक असेल तेथे बोरिंग तयार केल्या जातील; तसे पत्र देण्याचेही मनपा अधिकाऱ्यांनी सुचविले. प्रभाग क्र. १४ ब मधील नगरसेविका अन्सारी हसिना बानो साजिद अली यांनीही बोअरींग आणि सार्वजनिक शौचालयाची मागणी केली. शहरातील शाळा क्र. २०, २५ आणि ४४ मध्ये सायकलींचे वाटपासह महिला सभागृह उभाण्यात यावे. अशी मागणी अन्सारी अमेरा बानो सउदुल हसन यांनी केली.

## पर्यावरणूपरक गणेशोत्सव

स्वच्छता यांसारखे पर्यावरणपूरक उपक्रम राबवावेत. उत्सवादरम्यान निर्माण होणाऱ्या निर्माल्याचे घरच्या परिसरात कंपोस्ट खतामध्ये रूपांतर करावे. तसेच गणेशमूर्तीचे विसर्जन घरच्या बादलीमध्ये अथवा महानगरपालिकेने तयार केलेल्या कृत्रिम विसर्जन कुंडातच करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

उत्कृष्ट सहभागासाठी बक्षिसे

पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी विद्यार्थ्यांना व शाळांना प्रोत्साहन मिळावे यासाठी महानगरपालिकेतर्फे सर्वोत्कृष्ट सहभाग नोंदविणाऱ्या शाळांना प्रथम क्रमांकासाठी दहा हजार, ट्रॉफी व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी सात हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांकासाठी पाच हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र तसेच दोन उत्तेजनार्थ बक्षिसे प्रत्येकी तीन हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.त्याचप्रमाणे पर्यावरणपूरक घरचा गणपती उपक्रमासाठी प्रथम क्रमांक पाच हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांक तीन हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र, तृतीय क्रमांक दोन हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र तसेच दोन उत्तेजनार्थ बक्षिसे प्रत्येकी एक हजार ट्रॉफी व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

धुळे शहर स्वच्छ, सुंदर, हरित आणि पर्यावरणपूरक बनविण्यासाठी शाळा, विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रमात उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन धुळे महानगरपालिकेने केले आहे.

पान १ वरुन

## चांदसैली घाटातील दरड कायम

खासगी वाहन अथवा मोटारसायकलीवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे रस्त्याची धोकादायक अवस्था आणि सार्वजनिक वाहतूक सेवा बंद असल्याने नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे.मोठा अपघात घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरड व रस्त्यावर पडलेले दगड तातडीने हटवून मार्ग सुरक्षित करावा, तसेच चांदसैली घाटासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करावी आणि बंद झालेली मिनी बस सेवा पुन्हा सुरू करावी, अशी मागणी होत आहे.दरम्यान, २४ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्ह्याच्या बैठकीसाठी नंदुरबारकडे येत असताना या मार्गाची धोकादायक परिस्थिती निदर्शनास आली असून, त्याचा व्हिडीओ करण्यात आला आहे. अपघात होण्याची वाट न पाहता प्रशासनाने तातडीने रस्ता सुरक्षित करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## डॉ.विजयकुमार गावितांच्या प्रकृतीत सुधारणा

माजी मंत्री डॉ विजयकुमार गावित यांना नासिक येथील किम्स मानवता हॉस्पिटलमध्ये तातडीने दाखल करण्यात आले होते. बायपास सर्जरी नंतर प्रकृती सुधारली होती. परंतु पुन्हा प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना मुंबई येथील रिलायन्स समुहाच्या रुग्णालयात हलवणे भाग पडले होते. या सर्व काळात डॉक्टर सौ. कुमुदिनी गावित, माजी खासदार डॉ हिनाताई गावित, भाजपाच्या अनुसूचित जमाती मोर्चाच्या महाराष्ट्र उपाध्यक्ष डॉ सुप्रियाताई गावित यांनी त्यांची प्रकृती सुधारावी यासाठी पाठ पुजा आणि नवस ठेवणे चालवले होते. अनेक गावातील कार्यकर्त्यांनी चाहत्यांनी प्रार्थना करणे सुरू ठेवले होते.त्या दरम्यान, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण त्याचप्रमाणे पक्षातील अनेक वरिष्ठ मान्यवर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील वरिष्ठ मान्यवर यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन प्रकृतीची चौकशी केली होती. आपल्या लाडक्या नेत्याच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आणि शुभकामना व्यक्त करण्यासाठी नंदुरबार धुळे जळगाव जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्ते सुद्धा भेट देत होते. या सर्व पार्श्वभूमीवर आज डॉक्टर विजयकुमार गावित हे स्वतः मुंबईतून प्रवास करून नंदुरबार येथे उपस्थित झालेले पाहून कार्यकर्त्यांच्या आनंदाला पारावार राहिला नाही.


## अहिल्यादेवी माध्य.विद्या.त आरोग्य तपासणी संपन्न

धुळे, दि.२४- श्री सती देवी ट्रस्ट बोरीस संचलित, अहिल्यादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय अवधान येथे दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी विद्यार्थ्यांसाठी शालेय आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ राहावे, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.विद्यालयाचे प्राचार्य ए.डी. चौधरी यांच्या उत्कृष्ट नियोजनाखाली हे शिबिर पार पडले. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम(आरबीएसके) अंतर्गत पथक क्र. ३ जिल्हा रुग्णालय, धुळे येथील तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी विद्यालयाला भेट दिली.



|| धनदाई माता प्रसन्न || || श्री गणेशाय नमः || || जय जय रघुवीर समर्थ ||

कार्य सिद्धी नेण्यास श्री सद्गुरू समर्थ आहेतच


माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर



कै.भगवान सुंदर चौधरी



माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी



कै.श्रीमती लक्ष्मीबाई भगवानशेठ चौधरी

सस्नेह निमंत्रण

नामकरण सोहळा

नामकरण सोहळ्याचे अध्यक्ष

श्री.बाबासाहेब राजवर्धन कदमबांडे,माजी आमदार,धुळे शहर

प्रमुख पाहुणे: श्री.अमोल पाटणकर, उपसचिव मुख्यमंत्री कार्यालय,मंत्रालय,मुंबई

नामकरण हस्ते: श्री.मदनलालजी मिश्रा सर, अध्यक्ष लोकतंत्र सेनानी संघ धुळे

माजी आमदार स्व.डॉ.रा.भ. चौधरी नगरातील नियोजित विविध प्रकल्प

प्लॉट बुकिंग हफ्त्याने सुरु आहे

चौधरी वेअर हाऊस प्लॉटस | रघुवीर समर्थ कोल्ड स्टोरेज हाऊस | अलकनंदा लॉन्स

नामकरण हस्ते: मा.श्री. विनोदशेठ मित्तल, सुप्रसिद्ध उद्योगपती, धुळे

नामकरण हस्ते: मा.श्री. ओमप्रकाशजी अग्रवाल, ज्येष्ठ राजकीय व सामाजिक नेते, धुळे

नामकरण हस्ते: मा.श्री. सुभाषजी चोथमल अक्षवाल, सुप्रसिद्ध उद्योजक, धुळे

आलेल्या सर्व मान्यवरांचे हार्दिक स्वागत !

मातोश्री लक्ष्मी मंगल कार्यालय — नामकरण हस्ते : श्री. जगन्नाथ सुपडू चौधरी, शिरपूर तेली समाजाचे माजी अध्यक्ष

मातोश्री सरस्वती मंगल कार्यालय — नामकरण हस्ते मा.श्री. प्रकाश घवघवे (नागपूर), गिनीजबुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद असलेलेले ज्येष्ठ संशोधक

विनीत : श्री.रघुनाथ भगवान चौधरी * सौ.अलका रघुनाथ चौधरी * श्री.डॉ.नरेंद्र वामनराव राऊत (पुणे) * सौ. डॉ.संगिता नरेंद्र राऊत
श्री.मनोज रघुनाथ चौधरी * सौ.राजश्री मनोज चौधरी * श्री.मुकेश रघुनाथ चौधरी * सौ.पुनम मुकेश चौधरी
श्री. शुभम सतिषराव सव्वालाखे (अमरावती) * सौ.रश्मी शुभम सव्वालाखे *
चि. आर्यन * साक्षी * क्षितिज * सिद्धी * समर्थ * त्रिनय

रविवार दि ३० ऑगस्ट २०२६
वेळ : सकाळी १० वा.
भोजन दुपारी १२.३०ते ३.३० पर्यंत

नामकरण सोहळ्याचे स्थळ : माजी आमदार स्व.डॉ.रा.भ.चौधरी नगर ,पारोळा रोड, हॉटेल शितल च्या मागे, धुळे.



**प्लॉटस विकणे आहे**
फागणे धुळे येथील बाभुळवाडी रोड ५० फुट डांबरी रोड टच सर्व्हे नं.४०१/२-अ मधील एकूण ६ प्लॉटस् (क्षेत्रफळ: १२४२८ चौ. फुट) विकणे आहेत.
-: संपर्क :- 9423979015 9404104015

**शेती विक्री**
भाडणे शिवार, स. नं. ५४४/१, साक्री - पिंपळनेर रोड, नागाईकडे जाणारा रस्ता कॉर्नर येथील ९१ आर शेत विकणे आहे. इच्छुकांनी संपर्क साधावा.
-: संपर्क :- मो. 9850195001 9823189430

**विकणे आहे**
वलवाडी गोंदुर रोड दुकान फर्निचर पीओपीसह विकणे आहे. व भोकर शिवारात विमानतळ फाटा सर्व्हे नं.९/१/२ मधील प्लॉट विकणे आहे.
9011894666

**पाहिजेत**
रेडिमेड कापड दुकानासाठी १) सेल्समन- २ जागा २) हेल्पर- १ जागा (अनुभव असल्यास प्राधान्य) त्वरित भेटावे
रॉयल मेन्स वेअर, १३०६-ब, आदर्श पुस्तकाल्याजवळ, आग्रारोड, धुळे.
9423916107

**दुकान भाड्याने देणे आहे**
स्थळ- पंचवटी आग्रा रोड, देवपूर, धुळे
-: संपर्क :- (चित्रा बिर्ला) 9309445441

**विकणे आहे**
एक हाती वापर, उत्तम कंडीशन XUV 500 कं MH-06-BM-2061 (महिंद्र कं) गाडी विकणे आहे
-: संपर्क :- 9284805199

**शेती विकणे आहे**
वार शिवारातील गट नं. २६८/४ टकरे तलावाला लागून ४ एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. शेतावर जाणेसाठी कायमस्वरुपी स्वतंत्र रस्ता आहे.
-:संपर्क :- विलासराव माळी 8888101111

**प्लॉट विकणे आहे**
चार लाखात शहाद्यात प्लॉट :- शहादा-सावळदे शिवारात धुळे रोड पासून १०० मिटर अंतरावरील रेसीडेंशीयल ४०० रु. प्रती स्क्वे. फुटाने १०००-१२०० स्क्वे. फुटाचे प्लॉटस विकणे आहेत.
-:संपर्क :- 8055401841

**प्लॉट विकणे आहे**
रामचंद्र नगर कॉंक्रीट रोडटच प्लॉट विकणे आहे. कॉटन मार्केटच्या पुढे, रामचंद्र नगरमध्ये ६० फुटी कॉंक्रीट रोडला लागून ४३०० चौरस फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :- डी आर प्रॉपर्टीज 9422289693

**प्लॉट विकणे**
अग्रवाल नगरमध्ये २००० स्क्वेअर फुटाचा प्लॉट विकणे आहे.
-:संपर्क :- डी आर प्रॉपर्टीज 9422289693.

**३ बीएचके बंगला भाड्याने देणे**
मालेगांव रोड लगत, महावीर सोसायटी जवळ, तीन बेडरुम, हॉल, डायनिंग, किचन, स्टोअर रुम फर्निचरसह गार्डन कंपाऊंड पार्किंग सह बंगला भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :- डी आर प्रॉपर्टीज 9422289693

**प्लॉट विकणे**
3900 sq.ft. 15 mtr DP road front २ रोड कॉर्नर प्लॉट विकणे. अरुण कुमार वैद्य नगर
-: संपर्क :- 7391055331

**अजळकरनगर रो हाऊस विकणे**
सुरत बायपास जवळ अजळकर नगरमध्ये दोन मजली रोहाऊस घर फर्निचरसह विकणे आहे.
-:संपर्क :- डी आर प्रॉपर्टीज 9422289693

**घर भाड्याने देणे**
सर्व सोयींयुक्त तीन रुम भाड्याने देणे आहे.
-:संपर्क :- ६९ शिवप्रताप कॉलनी, नकाने रोड देवपूर, धुळे.
9422792512 777585524

**गरम पाण्याचा एकच उपाय...**
BAJAJ Crompton Racold USHA



गॅस गिझर

आजच खरेदी करा आणि मिळवा पाईप सोबत फिटिंग फ्री *...

* मॉडेल अनुसार

59 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोनः 229162, 235763


हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०